मे/जून २००४
अंक क्र. ५/६

# चैतन्य लहरी







# श्री आदिशक्ति पूजा

कबेला : ६ जून २००४









# अनुक्रमणिका


- करावा सहजयोग , बोलावा सहजयोग , सांगावा सहजयोग---------- २
- सहस्त्रार पूजा, कबेला ९ मे २००४------------------------ ३
- श्री आदिशक्ती पूजा, कबेला, ६ जून २००४---------------------५
- कुण्डलिनी योग- ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा-------------------- ८
- सहस्रार - आत्मा, सार्वजनिक प्रवचन दिल्ली, १८.२.८८ ------------- १२
- सहज समाचार ---------------------------------------- २२


## अगामी पूजा

| | |
|---|---|
| श्रीकृष्ण पूजा | १३,१४,१५ ऑगस्ट २००४, कान्हाजोहरी |
| गणेश पूजा | १७,१८,१९ सप्टेंबर २००४ कबेला |
| नवरात्री पूजा | १५,१६,१७ ऑक्टोबर २००४ कबेला |
| दिवाळी पूजा | १२,१४३,१४ नोहेंबर २००४ लॉसएन्जील्स |
| ख्रिसमस पूजा | २५ डिसेंबर २००४ - भारत |

## ......करावा सहजयोग
## ..........बोलावा सहजयोग
## ..........सांगावा सहजयोग

नुकतीच प.पू.श्रीमाताजींच्या चरणी गुरु-पूजा अर्पण झाली. गुरु-पूजा हा शिष्याच्या जीवनांतील भाग्याचा व समर्पणाचा दिवस. आपणा सर्वांचे महत् भाग्य हेच की साक्षात् आदिशक्ति आपल्याला गुरु-माऊली म्हणून लाभली.म्हणूनच आपल्या जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव आपण आधिक प्रकर्षानें व प्रगल्भतेनें ठेवली पाहिजे.

पूर्वीच्या काळी गुरु-दक्षिणा देणें हे शिष्याचे कर्तव्य मानले जाई. आपली गुरु-माऊली कांहींच मागत नाही. म्हणून आपले कर्तव्य हेच की आपली गुरु-माऊली कशामुळें प्रसन्न होईल याचे आपण भान ठेवणें आणि त्याप्रमाणें कार्यान्वित होणें. कुण्डलिनीचा प्रकाश आपल्यामधें आला आहे आणि त्या प्रकाशाचा आपण आपल्यासाठीं व इतरांसाठी कसा व किती उपयोग करून घेणार याचे विवेकपूर्ण भान सतत आपल्यामधें जागृत ठेवले पाहिजे. तसे झाले की आपली गुरुमाऊली आपल्याकडून योग्य ते योग्य वेळीं करून घेणारच आहे. अर्थात आपण अल्पसंतुष्ट होऊन बसून राहिल्यास कांहींच होणार नाही.

संत तुकारामांचा एक अभंग आठवतो. '' माझे मज कळो येती अवगुण । काय करुं मन अनावर । देवा आतां असा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ॥'' व्यक्तिमत्त्व हे जीवनाचे परिमाण आहे. केवळ भौतिक विचारांतच राहिलो तर आपले आस्तित्व संकुचित होते, त्यातून असमाधान व संघर्षाला पाय फुटतात आणि संतुलन बिघडते. आपल्या व्यक्तित्त्वाला 'स्व' राज्याच्या सुगंध आला तर जीवनाचे सार्थक होईलच पण त्याचबरोबर आपल्याला मिळालेल्या आत्मसाक्षात्काराचे ऋण फेडतां येईल.

सहजयोगी म्हणून आपले चित्त स्वत:कडे व बाहेर काय करत आहे हे आत्मपरिक्षण सतत करणें व त्यामधें सुधारणा करण्याचा सातत्यानें प्रयत्न करणें याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. त्यासाठीं शरणागति व उत्कट प्रार्थना हवी. प्रार्थनेनें मनांतील अनिष्ट वासना क्षीण होतात व अंत:करणाची दारे उन्नतीसाठीं उघडतात. मोठा वृक्ष होण्याची शक्ति बीजामधेच अंतर्भूत असते. आपल्यामधील त्याच शक्तीची जाण आपल्याला गुरुमाऊलीच्या कृपेनें आली आहे. म्हणूनच तिची जोपासना व वाढ आपल्याच हाती आहे हे लक्षांत घेऊन आपण स्वत:च्या व इतरांच्या अध्यात्मिक उन्नतिसाठीं प्रयत्नशील होणें हीच आपली गुरु-दक्षिणा ठरेल.

तुकारामांच्या विठ्ठलाबद्दलच्या भाषेप्रमाणें ''बोलावा सहजयोग, सांगावा सहजयोग, करावा सहजयोग, जीवभाव'' असें आपण होऊं या.

● ● ●



# सहस्रार पूजा

प.पू.श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण,
कबेला ९ मे२००४

## सत्याचा प्रकाश सहजयोग्यांच्या जीवनातून व्यक्त झाला पाहिजे

आजचा दिवस सहजयोग्यांसाठी फार महत्त्वाचा आहे. आजच्या दिवशींच सहस्रार उघडण्याची अलौकिक घटना घटित झाली. मला हे कधीं माझ्या आयुष्यांत घडेल असे वाटले नव्हते; पण मी ते करूं शकले आणि त्याच्यामुळें तुम्हा सर्वांचे सहस्रार उघडले. त्याशिवाय तुम्हाला अंतिम सत्य समजले नसते आणि तुम्ही पण इतरांसारखे भरकटले असता.

सर्व प्रथम लक्षांत घेतले पाहिजे की सहस्रार कार्यान्वित झाल्याशिवाय आपण सत्य ओळखूं शकणार नाहीं, अर्थात सत्य समजणार नाहीं आणि जाणूं शकणार नाहीं. आतां तुम्हाला सत्य काय हे समजले आहे आणि ते जाणण्याचा आनंदही तुम्हाला मिळाला आहे. सहस्रार उघडले आणि तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला हे फार मोठे वरदान आहे. त्याशिवाय त्याचे वर्णन नुसते शाब्दिक व अर्थहीन असते. म्हणून माझे सर्व लक्ष सहस्रार उघडण्याकडे लागले होते आणि ते सर्व अगदीं सुंदर तऱ्हेने घटित झाले व तुम्हा सर्वांचेही सहस्रार उघडले. ही फार असामान्य घटना होती आणि तुम्हा इतक्या साऱ्यांचे सहस्रार उघडले आहे यावर कुणाला विश्वासही वाटणार नाहीं. पण मला आतां तुमच्या सर्वांच्या डोक्यावरचा प्रकाश स्पष्ट दिसत आहे.

तुम्हाला मिळालेले हे भाग्य महान आहेच पण तुम्ही त्याचाच शोध आजपर्यंत नेटाने घेत आलात म्हणून तुम्हाला हा आशीर्वाद मिळाला. त्यात मी कांही खास केले असे मुळीच नाहीं; कारण तुम्ही एखादा दिवा असावा तसे तयारच होता आणि मी फक्त तो दिवा पेटवण्याचे काम केले इतकेच. तुम्ही ज्याचा शोध आजपर्यंत घेत आलात, ज्याच्यासाठीं इतके कष्ट करत आलात तो तुमच्यामधलाच प्रकाश तुम्हाला मिळाला ह्याचे श्रेय तुम्हालाच आहे, मला नाही. माझे सहस्रार उघडलेलेच होते पण तो अनुभव तुम्हाला मिळवून देणे ही माझ्यासाठीं अपार आनंदाची गोष्ट आहे. ज्यांचे सहस्रार उघडलेलेच नाहीं त्यांना हे समजणारच नाहीं, त्यांना कितीही समजावले, सांगितले तरी त्यांच्या कांहीही लक्षात येणार नाहीं. सहस्रार उघडले की सर्व कांहीं नीट समजते आणि तेच तुमच्या बाबतीत घडून आले आहे.

इथें सहस्रार उघडले आहे असे तुमच्यासारखे मोठ्या संख्येने आलेले लोक पाहिल्यावर मला फार समाधान होते, पुष्कळ जणांना इथें यायला जमलं नाहीं तरी हरकत नाहीं, पण असे सहस्रार उघडलेले लोक मोठ्या संख्येने सामूहिकतेत उतरतात ही मानवजातीला भूषण वाटावे, अशी घटना आहे.त्यामुळेंच तुम्हाला अंतिम सत्य समजले आहे, मग त्याची चर्चा करण्याची जरूर रहात नाहीं कारण आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही सत्य

जाणता आणि त्याचाच ज्ञान म्हणून स्वीकार करता. ही एक फार सुंदर घटना आहे; सहस्रार होतेच पण ते बंद झाले होते आणि एकदां ते उघडल्यावरच तुम्ही मला जाणूं शकता आणि परमात्म्याचे नीतिनियम जाणता. सत्य जाणण्याची तुमची धडपड इतकी तीव्र, प्रखर आणि शुध्द होती म्हणून परमात्म्याचे हे आशीर्वाद तुम्हाला मिळाले. एरवी खूप पैसा खर्च करून वा जिवापाड मेहनत करूनही कांहीं उपयोग झाला नसता. सहस्रार उघडणे ही त्याची स्वाभाविक प्रक्रिया आहे. म्हणून मी त्याचे श्रेय अजिबात घेत नाहीं, घेणारही नाहीं. सहस्रार उघडणें हे आपल्यासाठी किती आवश्यक व महत्त्वाचे आहे एवढेच फक्त तुम्हाला समजावून सांगण्याचे काम मी केले; कसलाही वाद वा चर्चा न करतां तुम्ही त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला म्हणून तुम्ही सत्यापर्यंत पोचला आहांत.

अशा या प्रसंगांत तुमची आई आणखी काय बोलणार? मी फक्त एवढेंच म्हणेन की तुम्ही त्या सत्याचा प्रकाशांतच जीवनाची वाटचाल करत रहा, तो प्रकाश तुमच्यामधून व्यक्त झाला पाहिजे याची जाणीव ठेऊन जीवनांत यशस्वी व्हा. नुसते ग्रंथ वाचून ज्ञान मिळत नाहीं, त्याने तर्क-वितर्कातच माणूस अडकून बसतो. ज्ञान हे अंतरंगातूनच प्रगट व्हायला पाहिजे आणि सहस्रार उघडल्यामुळेंच ते घटित झाले आहे.

जगभरांत अनेक देशांत आता हे कार्यान्वित होत आहे. अनेकानेक लोकांना आत्मसाक्षात्कार मिळत आहे व मिळणार आहे. मला एकच सांगावेसे वाटते की नुसते भावनाप्रधान होऊन त्याच्यांत रमूं नका तर ती प्रत्यक्ष जाणवणारी घटना आहे, ती प्रत्यक्ष घडणारी वस्तुस्थिति आहे हे लक्षांत घ्या. दुसऱ्यांना तुमच्याकडून आत्मसाक्षात्कार मिळाला की मगच तुम्हाला त्याचे महत्त्व समजेल व तुमची श्रध्दा वाढेल. तसे केल्याशिवाय आत्मसाक्षात्कार ही काय शक्ति आहे हे तुम्हाला समजणार नाहीं. म्हणून ही शक्ती तुम्ही वापरलीच पाहिजे. तुमच्यामधे ती शक्ति आहे, ती कार्य करू शकते, ती सदैव तुम्हाला उपलब्ध आहे याची जाणीवच तुमच्यामधील ही शक्ति वृध्दिंगत करणार आहे.

माझी प्रकृति सध्यां इतकी बरी नसते, माझे वयही झाले आहे; पण तुम्हाला भेटण्यामधें, तुमच्याशी बोलताना मला कधीं थकवा आल्यासारखे वाटतच नाहीं. इतक्या सहजयोग्यांचे सहस्रार उघडले आहे आणि त्याचा आनंद ते उपभोगत आहेत हे पाहूनच मला फार भारावल्यासारखे वाटते. तुमचे कांहीं प्रश्न असतील तर मला खुलासा करायला नक्कीच आवडेल; पण मला वाटते, की तुम्ही प्रश्न लिहून माझ्याकडे पाठवा, मी सवडीप्रमाणें त्यांची उत्तरे देईन; ही व्यवस्था मला जास्त बरी वाटते. सर्वांचे मी पुन्हा एकदां आभार मानते.

सर्वांना परमेश्वराचे अनंत आशीर्वाद.





# श्री आदिशक्ति पूजा

प.पू. श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण
कबेला : ६ जून २००४

'स्व' रूपात तल्लीन होऊन शांत व्हा; 'स्व' रूपांतच रममाण व्हा.

आजचा दिवसच फार महत्वाचा व विशेष असा आहे; म्हणूनच त्याचे आशीर्वाद खूपच लाभदायक व आनंददायक आहेत. समस्त विश्वनिर्मितीच्या पाठीमागें कार्यान्वित असलेल्या व त्यासाठींच प्रकट झालेल्या परमात्म्याच्या शक्तीचे अर्थात आदिशक्तीचे गुणगान , स्तवन करण्याचा हा महान दिवस आहे. ही शक्ति का व कशी प्रकट झाली व तिचे कार्य कसे चालते हे सर्व तुम्ही जाणताच , म्हणून त्याबद्दल मला कांही सांगण्याची जरूरी नाहीं.

पण आज तुमच्या हृदयांतही वास करून राहिलेल्या याच शक्तीच्या आशीर्वादाने तुम्ही मानवजातीचें एक सुंदर, नवीन नंदनवन इथेंच निर्माण करू शकता. हे अशक्य अजिबात नाहीं. ते होणारच आहे आणि त्याची सुरुवातही झाली आहे. अडचण एवढीच आहे की सगळ्यांशी मिळून-मिसळून एक -दिलानें एकत्र राहण्याची प्रवृत्ति माणसांत निर्माण करणें अवघड आहे. लोक आपापल्या जीवनांत मित्र - नातलगांबरोबर आपापला दिनक्रम नीट चालवत असतात. पण अशा सर्व लोकांना एकाच धाग्यांत गोवल्याप्रमाणें सामूहिकतेत समरसपणें उतरवणें अवघडच असते आणि त्याची तशी आवश्यकताही नाही. ते तसे होऊं शकणार नाहींत. पण त्याची सुरूवात व्हायला हवी.

आपल्यामधेही कांही चांगले लोक, सुंदर आत्मे, आहेत. पण ते एकमेकांमधे व्हायला पाहिजे तितके एकजीव झाल्याचे दिसत नाहीं. ह्यावर उपाय काय? मलाही कुणी तसा प्रश्न केला तर मी फक्त हसते. आपण जो हा योग चालूं केला त्याच्या मागची भूमिका हीच होती की माणसा-माणसांच्या अंतरंगांत एक्स-रे प्रमाणे उतरून त्या सर्वांमधील, आजपर्यंत कुणाला माहीत नसलेली, एकवाक्यता जाणून घेणें. तुमचे भाग्य असे की तुम्हाला ती आतमधील समान यंत्रणा (तत्त्व) एकच आहे हे समजले; त्या तत्त्वाशिवाय दुसरे कांहीं नाहीं हे तुम्ही जाणले. हेच एकमेव (सत्य) आहे आणि त्याचा जेव्हां आविष्कार होतो किंवा जेव्हां कांही कार्यान्वित होण्याची वेळ येते तेव्हां सर्वांच्यामधून तेच प्रकट होत असल्यानें एकाच प्रकारच्या घटना घटित होतात आणि त्याप्रमाणें समान कार्य घडून येते; त्यांत कसला बदल किंवा फरक संभवत नाहीं.

एवढें असूनही तुमच्या मनांची कुठल्या ना कुठल्या प्रश्नांमधें अडकून राहण्याची संवय सुटत नाहीं; खरं तर अशा प्रश्नांना सहजयोगाच्या दृष्टीनें कांहींच किंमत नसते. खरी अडचण ही आहे कीं सहजयोग्यांना कधीच प्रश्न नसतात हे आपण समजून घेत नाहीं. आपले प्रश्न आपण विचारांमधून निर्माण

केलेले असतात आणि त्याचाच आपण विचार करत राहतो. पण हे प्रश्न मुळांत नसतातच. मला कधींच कसला प्रश्न पडत नाहीं व दिसत नाहीं; ज्यांना असे प्रश्न सतावतात त्यांनी ते लिहून मला कळवावे.म्हणजे मी त्या प्रश्नांबद्दल त्यांना समजावून सांगेन. पण हा सारा खटाटोप करण्यापेक्षा मला मुख्य करून हे सांगावेसे वाटते की सहजयोगी लोक अजून त्या उच्च स्थितीला आलेले नाहींत की प्रत्येकजण त्याच पूर्ण-तत्त्वाचा अंश असल्याचे प्रत्येकाला जाणवेल; हा असामान्य एकजिनसीपणा प्रत्येकाला हृदयांमधे जाणवला पाहिजे. ही आंतून घटित होणारी गोष्ट आहे. म्हणून बाह्य उपचारांनी कांही होणार नाहीं.

आपण मूल-स्वरूपांत जे आहोंत ते सहजपणें जाणले पाहिजे. त्याच्यासाठीं कांही वेगळी सभा वा कार्यक्रम घेण्याची जरूरी नाहीं. तुम्हाला ते बनायचे आहे. हे साधारण लोकांच्या ध्यानांत येणे अवघड आहे. कारण प्रत्येकजण आपला चेहरा, नाक, डोळे दुसऱ्यासारखे नाहींत म्हणून स्वत:ला दुसऱ्याहून वेगळा समजतो आणि आपल्याबरोबर दुसऱ्यांनाही व्यापून राहणारे तत्त्व एकच आहे हे विसरतो. ही जाणीव जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत ही वेगळेपणाची भावना राहणारच. म्हणून मला हेंच तुमच्या मनांत बिंबवायचे आहे की तुम्ही सर्व एकच आहांत; सर्वांच्या प्रेरणा, भावना,जाण, एकसारखी आहे. फरक एवढाच की त्यांचा आविष्कार चुकीच्या वेळी, वेगवेगळ्या प्रसंगी अलग-अलग प्रकारे होतो आणि त्यामुळें त्यांच्यात वेगळेपणा असल्याचा भास होतो; मुळांत ते तसे नसते. कारण त्याचा स्त्रोत एकच-एक, अर्थात आदिशक्ति, आहे आणि तिचेच तुम्ही अंग-प्रत्यंग आहात. तुम्हाला कांहीही वाटले तरी तुम्ही आदिशक्तिपासून अलग होऊ शकत नाहीं; तिनेंच तुम्हाला जन्म दिला आहे, तीच तुमचा सांभाळ करणारी, मार्गावर आणणारी आहे. मला सगळीकडे तेच एकमेव रूप दिसते; तुम्हाल मात्र वेगवेगळे विचार, कृति असे भाव दिसतात पण ते खरे नाहीं.

मी जे कांही म्हणत आहे त्याची सत्यता सिध्द झाली पाहिजे; नाहीतर तुम्ही माझ्या एवढ्या व्यापक सिध्दांताला कसे मान्य करणार? तुम्हा सर्वांचे अस्तित्व माझ्यामधें सामावलेले आहे आणि मी सदैव तशीच राहणार आहे. मला कुठेच काही 'दुसरे' असे दिसत नाहीं. कपडे, राहणी इ. सर्व वरवरचे आकार आहेत, आंतमधील कांहीं फरक असलाच तर तो तुमच्याच विशिष्ट स्वभावामुळें असतो; त्यात थोडेसे जरी परिवर्तन झाले तरी तुम्हालाही इतर सर्वांमधे व तुमच्यामधें अंत:करणातील एकजिनसीपणा जाणवेल आणि मग ही वरवरची नाम-रूपे नाहींशी होतील.

आज मला गुंड वाटावा असा एकजण भेटला; मला तर त्याच्याकडे पाहून भीतीच वाटली; तो मला मारणार किंवा इतर कांहीं घात करणार का अशी शंका पण आली. मला काहीं समजेनासे झाले; पण तसे कांही नव्हते, उलट माझ्याबद्दल त्याच्या मनांत असलेला आदर व्यक्त करण्यासाठीं तो आला होता. आपण दुसऱ्याला कसे समजतो याचे कधी कधी आश्चर्य वाटते. जो पर्यंत तुम्ही दुसऱ्या व्यक्तीला नीट समजू शकत नाहीं तोपर्यत अर्थपूर्ण असे कांही तुम्हाला मिळूं शकणार नाहीं, जसे व्हायला हवेत तसे योग्य व्यवहार होणार नाहीं, अर्थात जे सत्य आहे ते समजणार नाहीं.

सत्य हे अनादि कालापासून चालत आलेले तत्त्व आहे, आपण त्याबद्दल इथें बोलण्या आधीही ते होतेच. पण त्याच्याबरोबरीनें अनेक असत्य गोष्टीपण चुकीनें प्रसरूं लागल्या आणि सत्य झाकळून गेले. उदाहरण म्हणून साप पहा ; सापाचा जन्म अज्ञानांतून झाला, त्याच्याबरोबर मग अनेक साप येत राहिले आणि त्याला मदत करू लागले आणि वाढत वाढत त्यांचा एक संघच तयार झाला; मग सगळीकडे फसवेगिरी, भ्रामक गोष्टी, सर्परूपानें वाढू लागल्या व शेवटीं भांडणे, मारामाऱ्या सुरू झाल्या आणि एकमेकांचे नुकसान सुरू झाले. आता

सापासारख्या हानिकारक गोष्टी किती काळ चालवू देणार., त्याच्या पाठीमागे किती लागणार, व त्याच्यावर किती काळ विसंबून राहणार हा अवघड प्रश्न आहे; पण सत्याच्या ऐवजी या असत्यालाच जास्त मान्यता मिळते! असे कां होते? कारण आपण स्वत:ही असत्यावर उभे असतो म्हणून आपले सर्व समज असत्यावर आधारीत असल्यामुळें आपल्याला सत्य समजणें अवघड जाते. म्हणून आपण सत्य समजून घेतले पाहिजे आणि सत्य समजणें अवघड नाहीं; कारण आपण मूल-स्वरूपांत 'सत्य' च आहोत. जे आपल्यामधेंच आहे ते समजणें अवघड कसे असूं शकेल? पण ते तसे होते म्हणजे आपल्यामधेंच कांहीं तरी कमी आहे हे लक्षांत घेऊन ते कमी काय आहे हे बघितले पाहिजे. आपले हेच चुकते की आपण स्वत:ला पाहूं शकत नाहीं; दुसऱ्यांकडेच सतत पाहत राहण्याची संवय असल्यामुळें आपण स्वत:कडे बघतच नाहीं; आपण कुठे आहोत वा कुठें चाललो आहोत इकडे आपले लक्षच नसते. त्यासाठींच आईची गरज आहे कारण तीच तुम्हाला मार्ग दाखवणारी आहे.

यासाठीच माताजी म्हणून देवीला पृथ्वीवर अवतरण घ्यावे लागले आणि तीच तुमच्या 'आतमधे' जे कमी आहे ते ठीक करणार आहे. हे प्रथम तुम्ही मानले पाहिजे आणि तीच तुमची श्रध्दा झाली पाहिजे. मग तुमचे तुम्हालाच आश्चर्य वाटेल की आपल्या जवळच, स्वत:बद्दल व बाहेरच्या गोष्टींबद्दल सर्व ज्ञान आहे. मग तुम्हाला त्याबद्दल कांहीं विशेष, खास आहे हेहि जाणवणार नाहीं. म्हणून स्वत:च स्वत:ला आधीं ओळखले पाहिजे आणि त्याचा स्वीकार केला पाहिजे.

मला वाटते लोक सहजयोगांत येतात पण सहजयोगी बनत नाहींत. तसा प्रयत्न लोक करत आहेत; उलट आपण सहजयोगी आहोतच, म्हणून आणखी कांही होणें आपल्याला लागू नाहीं असा आत्मविश्वास त्यांच्या मनांत दृढ झाला पाहिजे. सहजयोग वेगळा, सहजयोगी वेगळे आणि आपण स्वत: त्याहून वेगळे असा समज करून घेतला तर कांही होणार नाहीं. याला कारण म्हणजे आपलेच अज्ञान; त्यामुळे आपण एकमेकांबरोबर परके असल्यासारखे वागतो; हे अज्ञान नाहींसे होऊन सर्व एक (जीव) आहोत अशी श्रध्दा निर्माण झाली पाहिजे. असे झाल्यावरच जगातील सर्व प्रश्न सहजपणे दूर करता येतील.

आजची पूजा विशेष आहे; कारण आज जे सनातन, अबाधित , अक्षय ,अक्षर व निरंतर आहे त्या (शक्ती ) ची पूजा आपण करत आहोत. अशा पूजेमधें मी किंवा आणखी कोणी काय सांगणार? आपण आपल्या स्व-रुपाशी तल्लीन होऊन शांत होऊ या. आपले अवधान, बाहेरचे वातावरण. शब्द किंवा इतर गोष्टींकडे वळणाऱ्या बुध्दिचे व्यापार थांबवून, संपूर्णपणे आपल्या स्व-रूपांत रममाण झाले पाहिजे. मन स्वभावत: चंचल असल्यामुळें त्याची धांव चुकीच्या गोष्टींकडे जाणार नाहीं याची काळजी घेतली पाहिजे.

त्यासाठीच आपल्याला आदिशक्तीची पूजा केली पाहिजे आणि आदिशक्तीच्या आज्ञांचे परिपालन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्यामधील आदि आत्मतत्त्व कार्यान्वित केले पाहिजे. नको त्या विकार - विचारांच्या आहारी न जाण्याची खबरदारी घेतली पाहिजे. हे आपण करूं शकलो तर फार उत्तम होईल. मला खात्री आहे की आपण हे करूं शकूं. आपण भारतीय, इंग्लिश , युरोपियन इत्यादी भेदभावांना अजिबात थारा न देता, आत्मस्वरूपाशी सदैव संलग्न राहून आत्मसाक्षात्काराचा गौरव वाटेल असे आत्मैक्य मिळवले पाहिजे.

सर्वांना परमेश्वराचे अनंत आशीर्वाद.

●●●

# कुण्डलिनी योग - ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा



श्रीमद्भगवतगीता सर्व सामान्यांकरतां सुलभ व्हावी म्हणून मूळ ७०० श्लोकांचा १०३३ ओव्यांमधें विस्तार करून प्राकृत भाषेंत ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संतपरंपरेचे अग्रणी मानले जातात. ज्ञानेश्वरीतील कुण्डलिनीयोग हा ६ वा अध्याय सहजयोग्यांनी मनन करावाच असा आहे. मूळ प्राकृत ओव्यांचा अर्थ लक्षांत येण्यासाठीं त्यांतील कांहीं उपयुक्त अशा निवडक ओवींचा अर्थ स्पष्ट करण्याचा ही मालिका हा एक प्रयत्न आहे व या अंकापासून ती सुरू होत आहे.

..........तेसे गीतार्थाचे सार । जे विवेकसिंधूचे पार ।
नानायोग विभव भांडार । उघडले कां ॥ ११ ॥
जे आदिप्रकृतीचे विसवणें । जे शब्दब्रह्मर्सि न बोलणें ।
जेथूनी गीतावल्लीचे ठाणें । प्ररोहो पावे ॥ १२ ॥
तो अध्याय हा सहावा । वरि साहित्याचिया बरवा ।
सांगिजेल म्हणोनी परिसावा । चित्त देऊनी ॥१३ ॥
माझा मराठाचि बोलु कौतुके । परी अमृतातेही पैजासी जिंके ।
ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १४ ॥

(तहानलेल्या माणसाच्या हातात पाण्याएवजी अमृत यावे अशी वेळ येऊनही धृतराष्ट्राला मोहामुळें समजत नाही - जन्मांधाला कसे उजाडेल ? - ऐवढीं सुरवात करून ज्ञानदेव या अध्यायाचे महत्त्व सांगताना म्हणतात )

हा सहावा अध्याय गीतेचे सार आहे, विचार रूपी समुद्राचा पलीकडचा किनारा आहे, अष्टांगयोगाच्या ऐश्वर्याचें खुले केलेले कोठारच आहे. जे आदिमायेचे मूळ विश्रान्ति स्थान आहे, वेदही ज्याचे वर्णन करण्यास असमर्थ आहेत, पण जिथे गीतारूपी वेलीच्या अंकुराचे स्वरूप वाढू लागले आहे असा हा सहावा अध्याय आहे, तो उपमा-अलंकारांनी समजाऊन सांगणार आहे. म्हणून लक्ष देऊन ऐकावा. (मराठी भाषाही त्यासाठीं कमी पडणार नाहीं अशी ठाम श्रध्दा व प्रतिभा असल्यामुळें ज्ञानेश्वर ठासून म्हणतात) हे प्रतिपादन मराठी भाषेत असले तरी लीलेने

अमृतालाही प्रतिज्ञापूर्वक जिंकेल अशी रसयुक्त शब्द रचना मी करणार आहे.

..........हे असोतु या बोलाची ताटें भलीं । परी कैवल्यरसें वोगरली ।
ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥ २२ ॥
आता आत्मप्रभा नीच नवी । तेचि करूनी ठाणदिवी ।
जो इंद्रियांते चोरूनी जेवी । तयासीचि फावे ॥ २३ ॥
येथ श्रवणाचेनि पांगें- । वीण श्रोतयां व्हावे लागे ।
हे मनाचेनि निजांगे । भोगिजे गा ॥ २४ ॥

(शब्दांचे असामान्य, सूर्यासारखे व्यापकपण ) राहूं दे. शब्द जणूं ताटे आहेत व त्यात मोक्षरूपी पक्वान्ने वाढली आहेत अशी ही ग्रंथरचनारूपी मेजवानी मी निष्काम पुरुषांसाठी केली आहे. आतां नित्य नवा आत्मप्रकाश हाच कोणी एक ठाणदिवा करून, जो इंद्रियांना न कळता उपभोग घेतो. त्यालाच ( या पक्वान्नाचा)लाभ होतो. या मेजवानी करतां श्रोत्यांना श्रवणेंद्रियाचा पंगिस्तपणा टाकून, मन अंतर्मुख करून त्याचा आस्वाद घ्यायचा आहे. (चित्त हळुवार झाले तरच या निरूपणाचा उपयोग होईल असे पुढें ज्ञानदेव म्हणतात)

.........जे दिठी न पाविजे । ते दिठीवीण देखिजे ।
जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ॥३३ ॥
.........तेणे कारणें मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दावीन ।
अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियां करवी ॥ ३६ ॥

(कुण्डलिनी योगाचे एवढे असाधारण महत्त्व सांगितल्यावर त्याची फलप्राप्ति अनुभवसिध्द आत्मविश्वासाने सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात )

जे दृष्टीलाही दिसत नाहीं ते डोळ्यांशिवाय पाहता येईल अशा अतींद्रिय ज्ञानाचे बळ प्राप्त होईल. (सद्गुरु निवृत्तिनाथांच्या कृपेनें ) अरूप ब्रह्माचे रूप मी दाखवीन; जरी ते (ब्रह्म)इंद्रियांना गोचर होण्यापलीकडचे आहे, तरी त्याचाही इंद्रियांना अनुभव येईल असे मी करीन.

( यापुढें योगी कसा ओळखावा त्याची लक्षणें कोणती हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात )

.........अर्जुना गा तोचि योगी । जो कर्मे करूनि रागी ।
नोहेची फळीं ॥४३ ॥
.........ते तैसे उचित करी । परी साटोपु नोहे शरीरी ।
आणि बुध्दिहि करोनी फळवेरी ।
जायेचिना ॥ ४६ ॥
.........तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा ।
जो आत्मबोधाचिया वोवरा । पहुडला असे ॥ ६२ ॥
जयाचे सुखदु:खाचेनि आंगे । झगटले मानस चेवो नेघे ।
विषय पासींही आलियासे न रेघे । हे काय म्हणऊनि ॥ ६३ ॥
इंद्रिये कर्माच्या ठायीं । वाढिवली परी काही ।
फळ हे तूची चाड नाहीं । अंत:करणी ॥ ६४ ॥

असतेनि देहे एतुला । जो चेतुचि दिसे निदेला ।
तोचि योगारूढ भला । वोळखे तूं ॥६७ ॥

जो कर्माचे आचरण करून त्याच्या फलाविषयी आसक्त होत नाहीं तोच या जगामधे योगी म्हणून मान्य होतो. ( जे कर्म ज्यावेळेला करणें प्राप्त आहे ) ते व्यवस्थित करतो, परंतु त्यासंबंधी आपल्या ठिकाणी कर्तव्यबुध्दि घेत नाहींच पण बुध्दीनेही फळापर्यंत जात नाहीं. (फलाची इच्छा करत नाहीं.)ज्याच्या इंद्रियरूपी घरांत विषयांचे येणे-जाणे होत नाहीं आणि जो आत्मज्ञानरूपी विश्रांतीच्या खोलीत स्वस्थ निजलेला असतो, सुख-दु:खाचे धक्के बसले तरी ज्याचे मन जागे होत नाहीं; विषय समोर आले तरी, हे काय आहे, असे विचारण्याचे ज्याला स्मरणही होत नाहीं. इंद्रिये काम करत असली तरी ज्याच्या मनांत फलाची इच्छा कधीही उत्पन्न झाली नाहीं; जो देहधारी असूनही याप्रमाणें असतो व जो जागृत पुरुषाप्रमाणें सर्व व्यवहार करीत असूनही निद्रिस्त असल्यासारखा क्रियाशून्य भासतो, तोच उत्तम प्रतीचा व निष्णात योगी आहे (योगारूढ )असें समज.

(इथेच भगवंतांनी '' उध्दरेदात्मना ऽऽत्मानं ......... आत्मै बन्धुरात्मैव रिपु: '' असे सांगितले आहे; त्यावर भाष्य करताना ज्ञानदेव पुढें सांगतात )

..........म्हणऊनि आपणपेया आपणचि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु ।
येर स्वयं बुध्दि म्हणजे बापु । जो नाथिले नेघे ॥ ८० ॥
तया स्वांत:करणजिता । सकळकामोपशांता ।
परमात्मा परौता । दूरी नाहीं. ॥ ८१ ॥
......... हा घटाकारू जैसा । निमालिया तया अवकाशा ।
नलगे मिळो जाणे आकाशा । आना ठाया ॥ ८३ ॥
तैसा देहाहंकारु नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला ।
तोचि परमात्मा संचला । आधिची आहे ॥८४ ॥
..........जे जया वाटा सूर्यु जाये । तेउते तेजाचे विश्व होये ।
तैसे तया पावे ते आहे । तोचि म्हणौनी । ८६ ॥

ज्यानें आपला संकल्प (देहाभिमान ) वाढविला आहे तो आपणच आपला शत्रू होतो. जो खोट्याचा (मिथ्या देहाचा ) अभिमान घेत नाहीं तोच आत्मज्ञानी असतो. अशा त्या पुरुषाने आपले अंत:करण जिंकल्यामुळें व त्याच्या सर्व इच्छा निवृत्त झाल्यामुळं, त्याला परमात्मा लांब नाहीं. घट फुटल्यावर त्याचा आकार नाहींसा होतो पण त्यातील पोकळीस आकाशांत मिळण्याकरतां ज्याप्रमाणे दुसऱ्या ठिकाणीं जावे लागत नाहीं, त्याप्रमाणे ज्याचा हा देहाहंकार नाहींसा झाला आहे तो मुळचाच सर्वत्र भरलेला परमात्मा आहे. सूर्य ज्या मार्गाने जातो तितका जगाचा भाग प्रकाशित होतो, त्याप्रमाणें त्याला जे जे प्राप्त होते ते त्याचेच स्वरूप आहे (म्हणजे कसलेही द्वंद्व -मी तू- उरत नाहीं हा अद्वैत सिध्दांत)

(हाच अद्वैत सिध्दांत पुढें स्पष्ट करतांना ज्ञानदेव म्हणतात )

..........जो हा विज्ञानात्मकु भावो । तया विवरितां जाहला वावो ।
मग लागला जव पाहों । तंव ज्ञान ते तोचि ॥ ८८ ॥
ऐसा शरीरीची परी कौतुके । परब्रह्माचेनि पाडे तुके ।
जेणें जिंतली एके । इंद्रिये गा ॥ ९० ॥


तो जितेंद्रियु सहजे । तोचि योगयुक्त म्हणिजे ।
जेणे साने थेर नेणिजे । कवणें काळीं ॥९१॥


अनुभवाला येणारे दृश्य जगत त्याचा विचार करतां ते, त्याच्या दृष्टीनें मिथ्या ठरले आणि ज्ञान तेच आपण आहोंत असे त्याला कळले. अशा ज्या कोणी एकानें आपली इंद्रियें जिंकली आहेत तो देहधारी असला तरी परब्रह्माच्या बरोबरीचा ठरतो. त्याला लहान -थोर असा भेद कोणत्याही वेळेला प्रतीत होत नाही. तो सहजच जितेंद्रिय आहे आणि त्यालाच योगयुक्त म्हणावे. (याच्याच पुढें ''मीचि विश्व ऐसा जयाचा । बोधु जाहला ॥९५॥'' म्हणजे जे त्याला नातलग, वैरी, वाईट - चांगले इ. भेद उरत नाहींत व तो निरिच्छ-आणि विश्वात्मक होतो - असे वर्णन केले आहे.)

(योगी कसा असतो या कृष्णार्जुन संवादाचा समारोप ज्ञानदेव फार बहारदार शब्दात करतात)

ऐकें व्दैताचा ठावोची फेडी । ते ब्रन्हविद्या की जेल उघडी ।
तरी अर्जुन पढिये हे गोडी । नासेल हन ॥ ११३ ॥

(मला वाटते ) व्दैताचा ठावठिकाणा नाहींसा करणारे हे आत्मज्ञान आणखी उघड उघड व्यक्त केले तर, अर्जुन मला आवडतो ही प्रेमाची गोडीच खरोखर नाहींशी होईल (असे देवाला वाटले.)





# सहस्त्रार - आत्मा

सार्वजनिक प्रवचन, दिल्ली, दिनांक १८.२.८८

आपला आतला आनंद सहजतेनेमिळविण्यासाठी कुण्डलिनी सहस्राराचे भेदन करुन वर येणेआवष्यक आहे.

सत्याच्या शोधात असणाऱ्या सर्व साधकांना आमचा नमस्कार.

आज आपण जे कर्णमधूर संगीत ऐकले त्याचा आजच्या विषयाशी निकटचा संबंध आहे. सर्व व्यवस्था सहजपणे होते. आज आपण जो बारा स्वरांचा खेळ पाहिला, ऐकला तसे संगीत आपल्या आत निर्माण होऊ शकते. आपल्या आत तुम्ही कुण्डलिनीची अष्टचक्रे पहाता. जसे मूलाधार चक्र, मुलाधार, स्वाधिष्ठान, नाभी, ह्रदय, विशुध्दी, आज्ञा व सहस्रार. या शिवाय आमच्या आत सूर्य व चंद्र यांचीही चक्रे आहेत. तसेच ब्रह्मरंध्र छेदन झाल्यावर वर तीन चक्रे कार्य करतात. ज्याला आम्ही अर्ध - बिंदू, बिंदू आणि वलय म्हणतो. तसेच सर्व स्वरही आमच्या आत आहेत. मूलाधारावर 'सा' ने सुरवात करुन सारेगमपधनी असे सात स्वर, 'नी' सहस्रारावर येतो. अशाप्रकारे सात ग्रहही आहेत जे या सात चक्रांना शक्ती देतात. मूलाधारावर मंगळ, स्वाधिष्ठानावर बुध, नाभीवर गुरु, ह्रदयावर शुक्र, विशुध्दीवर शनी, आज्ञावर रवि आणि सहस्त्रारावर चंद्र जे शिवा चे स्थान आहे आणि आदिशक्तीचेही स्थान मानले जाते. अशा प्रकारे ग्रहांचाही या चक्रांवर वास आहे. याचा अर्थ श्रीगणेशांपासून जो ओंकार प्रकट होतो त्यातून या स्वरांना एका तालांत, एका स्वरात बध्द करुन संगीताचा एक सुंदर साज आपल्या आत तयार ठेवला आहे. हे घडण्यासाठी कुंडलिनीला कार्यान्वित व्हावे लागते. ही कुंडलिनी जेव्हां सहस्रारात पोहचते, तेव्हां न जाणे किती घटना कार्यान्वित होतात.पुष्कळ लोक मला विचारतात की, 'श्रीमाताजी हे इतके सरल कसे?' जेवढ्या जिवंत क्रिया आहेत त्या अगदी सहजतेने होतात.बीजही आपोआप अंकुरीत होते हे आपण रोज बघतो व जाणतो. त्याविषयी आपल्याला कधीच प्रश्न नसतो, आपण गृहितच धरतो. आपला जो श्वास चालतो किती सहज? त्यासाठी आपल्याला एखाद्या गुरुकडे जावे लागले असते, एखादा ग्रंथ वाचावा लागला असता किंवा वाचनालयात जावे लागले असते तर किती लोक जिवंत राहिले असते? ह्रदयाचे स्पंदनही आपोआप चालते. यासाठी कुठल्या बाह्य शक्तीची गरज लागली असती तर किती लोक जिवंत जन्मले असते? अशा अनेक जिवंत क्रिया आपण पहातो. ही फुले उमलतात, आपोआप, त्याची फळे -ही होतात. आपोआप हीच ती 'ऋतंभरा प्रज्ञा' प्रज्ञा जिने या सर्व सृष्टीला आशिर्वादित केले आहे. हे सर्व जिवंत कार्ये ती करते, हे सर्व इतके अद्वितीय आहे की त्याचे अनुमान आपण आपल्या बुध्दीतून करू शकणार नाही. म्हणजे एका आंब्याच्या झाडाला आंबेच लागतात. एका हिंदुस्थानी घरात हिंदुस्थानीच जन्मतो. याचा अर्थ असा नाही की त्याचा एक ठसा असतो. पण त्याचा चेहरा हिंदुस्थानी असतो. ही सर्व साखळी, ते कार्य इतके गहन व गणिताने बनलेले आहे याचा अंदाज मानवी बुध्दी करु शकत नाही. जसे आधी मी सांगितले आहे की, हा जो एक थेंब आहे त्याला आम्ही सागरात सोडले पाहिजे. जेव्हां तो त्यात एकाकार होतो, तेव्हां त्याची सर्व शक्ती तो पाहू शकतो जाणू शकतो. त्याचा आनंदही घेऊ शकतो. कुंडलिनी हेच कार्य करते. आपल्या मस्तिष्कातील सर्व

चक्रे (मूलाधार ते आज्ञा) ज्यांना सहस्त्रारातील चक्रांची पीठे म्हणतात, पूर्णपणे आपल्या कार्याशी संलग्न होतात. जी चक्रे आपण खाली पहातो, (पाठीवर) त्यांची पीठे आपल्या सहस्रारात आहेत. हे आपण पुस्तक वाचूनही जाणू शकतो. हे सर्व रचणाऱ्याची कमाल बघा. सात चक्रांचे जे स्वर आहेत त्यांचे निनाद या सात पीठात कसे घुमतात ते पहाण्यासारखे आहे. याला लागणाऱ्या शक्ती या सर्व एक सुंदर सुधारित,सुरचित स्वरांना एका तालात, एका स्वरात कसे गुंफतात, आलापित करतात ती एक कमालच आहे. हे आपण पाहू शकत नाही. कारण आपली दृष्टी नेहमी बाहेर असते. त्यासाठी आपली दृष्टी आत वळवली पाहिजे. लोक विचारतात, 'श्रीमाताजी हे कसे होते?' . आता आपण मी जे बोलते याकडे आपले सारे चित्त आहे. जर एखादी क्रिया आत घडली तर आपले चित्त तेथे जाते. कुंडलिनीच्या जाग्रणाने आपले चित्त जे बाहेर असते ते आत खेचले जाते. जेव्हां कुंडलिनी सहस्रारावर येते, जसे एखादे कापड (तंबूसारखे)आतून वर उचलले जाते तेव्हा या कुंडलिनीचा प्रकाश त्या सर्व कापडावर पसरतो.(व्यापून टाकतो) असे होते की,'रामरंग रसभिनी' अशी आपल्या चित्ताची जी चादर आहे त्यात आपल्या चित्ताचा प्रकाश पसरतो.

हृदय जे मधोमध आहे ती रचना पहा. आपले सहस्रार जे मधोमध आहे त्याचे भेदन होते. याचा अर्थ आपल्या हृदयात जोपर्यंत ईश्वराला प्राप्त करण्याची इच्छा होत नाही, तो पर्यंत हे (सहस्राराचे) भेदन नीट होणार नाही. सर्व काम हे हृदयाचे आहे हे समजून घेतले पाहिजे. जरी माझे <u>हे म्हणणे आपण बुध्दीने समजू शकता, तरी हे जोपर्यंत आपल्या हृदयातून संचारित होत नाही तोपर्यंत आपल्या अंग अंगात गोष्ट भरत नाही.</u> आत्म्याचे स्थान आपल्या हृदयात आहे. मग आपण लक्षांत घेतले पाहिजे की आपल्या सहस्राराचे भेदन होण्यासाठी आपले हृदय आधी उघडले पाहिजे. या हृदयात वास करणाऱ्या आत्म्याला त्याच्या भोवती मस्तिष्कातील सात पीठापडून सात रंगाचा प्रकाश वलयंकित करतो. एवढा मस्तिकाचा व हृदयाचा निकटचा संबंध आहे. पण आज आपले हृदय एकीकडे कार्यान्वित असते, शरीर दुसरेच काम करते आणि बुध्दी तिसऱ्या ठिकाणी खेचत असते. त्यांच्यात समग्रता नसते. समग्रता म्हणजे सर्व अंगातून एकच सूत्र जायला हवे. म्हणजे यात 'इंटिग्रेशन ' नसते. आपणच आपल्याशी झटत असतो. कुणाचे एक चक्र खराब तर दुसरे ठिक. दुसरे ठिक तर तिसरे कमजोर आहे. तर चौथे खराब असते. या चक्रांच्या संग्रामाने मानवात द्विधा अवस्था निर्माण होते.निराशा,चिंता आजारांचा शिरकाव होतो. ही सर्व चक्रे पंचमहाभूतातून निर्माण झालेली आहेत. एक शेर सांगते,'मौत क्या है, इन्ही अजदाकश परेशा होना' प्रमाणे जेव्हां ही चक्रे खराब होतात तेव्हां मृत्यु ओढावतो. ही चक्रे ज्या पीठाकडून संचलित होतात ती पिठे आपल्या मस्तकात आहेत. येथूनच आपल्या मध्यवर्ती मज्जासंस्थेबरोबर या चक्रांचे चलनवलन झालेले असते. तसे ते होत नाही. ते आपल्यातील पॅरासिंपथेटिक कडून (सुषुम्ना)होते . जोपर्यंत आपण या पॅरासिंपथेटिकवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करत नाही आणि आपली जी <u>स्वयंचालित मज्जासंस्था जी आपण चालवू शकत नाही अशा ह्या 'स्वयं' वर कब्जा मिळवत नाही तोपर्यंत आपण स्वत: बदलणार नाही ना जगाला बदलू शकणार नाही.</u> बाहेरून आपण एखादी गोष्ट नीट करू शकतो. जसे झाडाला ठीक करायचे असेल तर बाहेरच्या पानावर उपचार तात्पुरता हो ऊ शकतो. पण बिघाडाचे मुळ कारण त्याचे 'जडत्व' आहे. त्याला कायमचे ठीक करावयाचे असेल, त्याच्या आतून वाहणाऱ्या जीवरसात ते औषध घातल्याशिवाय झाडाला आपण वाचवू शकणार नाही. आपल्या मस्तिष्कात सात चक्रांच्या पीठाचे संगठन तर आहेच. पण याशिवाय तीन शक्त्या ज्या आपल्यात प्रवाहित आहेत. (महाकाली,महासरस्वती,महालक्ष्मी) आमची इच्छाशक्ती, कार्यशक्ती व धर्मशक्ती जी आपला उत्क्रांतीचा मार्ग तयार करते व त्यावर आपण असतो. अशा तीहींचेही एकत्रीकरण होते. अशा तऱ्हेने आपल्या मस्तिष्कात सात चक्रे व या तीन शक्त्या यांचा समन्वय घडतो. त्यांचा एकमेकाशी ताळमेळ असतो. पण त्यांचे सामिलीकरण (इंटीग्रेशन)नसते. जसे एका तालात,एका सुरात सात स्वरांचे चलन होते. अशी स्थिती तेव्हां प्रस्थापित होते जेव्हां या मण्यांच्या छिद्रातून एखादा दोर जावा. तशीच कुंडलिनी सर्व चक्रांना भेदून सहस्रारात येते. या सहस्राराबद्दल जेवढे सांगावे तेवढे कमीच आहे.

शेवटच्या या सहस्राराच्या चक्राच्या १००० पाकळ्या आहेत. किंवा या १००० नाड्या आहेत. काही डॉक्टर त्या ९८२ इ. आहेत असे म्हणतात. या सर्व हृदयहीन गोष्टी आहेत. ज्यात काही सूर नाही, माधुर्य नाही. या १००० पाकळ्या या १००० नाड्यांना प्रकाशित, तेजोमय करून अशा दिसतात की एका कमलपुष्पात त्याच्या १००० पाकळ्या सजीव होऊ न सप्तरंगाची उधळण करत डोलत असतात. अत्यंत शांत अशा या तेजोमय तेज:पुंज १००० ज्योती प्रकाशमय होऊन (प्रदीप्त) त्यांच्यात आंदोलन होत असते. या आंदोलनांच्या तरंगातून आपल्या आत आनंदाची निर्मिती होते. हाच तो निरानंद. निरानंद म्हणजे केवळ आनंद (absolute joy). यात दुसरे काहीच व्यतीत नसते. दु:खही नसते, सुखही नसते. केवळ आनंद जो त्या मौनावस्थेत घेता येतो आणि जाणवतो. जसे कबीर म्हणतात, 'जब मस्त हुऐ फिर क्यां बोले?' ही जी श्रेष्ठांची योग्यांची स्थिती आहे अशा निरानंद स्थितीला येण्यासाठी कुंडलिनी तुमच्यासाठी तत्पर आहे. तिला तुमच्या थोड्याशा प्रयत्नाने ती तुम्हांला अशा स्थितीला नेईल की ह्या निरानंदाच्या सागरात तुम्ही पूर्ण न्हाऊन निघाल. इतकी कुंडलिनीची शक्ती काव्यमय आहे, इतके सुंदर तिचे चलनवलन आहे. बऱ्याच लोकांत कुंडलिनी 'आहत' स्थितीत दिसते. असे वाटते एक कमजोर माता लटपटत, कसेही करुन आपल्या मुलाला पुनर्जन्म देण्यासाठी उठते, परत बसते, परत उठते, हळूहळू उठण्याचा प्रयत्न करते. ही कुंडलिनी हजारो वर्षे तुमच्या अनेक जन्मात बरोबर राहून आता पुन्हा तुम्हाला पुनर्जन्म देण्यासाठी या जन्मी तुमच्याबरोबर आली आहे. . माझ्या या मुलाला दुसरा जन्म प्राप्त व्हावा म्हणून पूर्णतया प्रयत्नात असते. ही करुणामयी माता, प्रेममयी माता आपल्याला कसा त्रास देऊ शकेल?. जी हजारो वर्षे वाट पहात तिला वाटते की एक दिवस हा मुलगा शुध्द इच्छेला पूर्ण करुन या योगाला प्राप्त होईल. ती तुम्हाला कशाल दु:खित करेल?. या जगात मी अशा अनेक लोकांना पहाते की त्यांना कुठल्याही गोष्टीबद्दल आदर नसतो. स्वत:बद्दल तर नसतोच. या जीवनात काही उच्च मूल्ये असतात हे कसे समजेल? आपल्यासमोर संतांची अनेक उदाहरणे आहेत. ते या संसारात आले ते काय स्वत:साठी? आपण हे विसरतो. त्यांनी तर सर्व काही मिळविले होते. खरे तर ते आपल्याला काही देण्यासाठी आले होते. आणि आपल्या आत जे घडावायचे, ते कार्य त्यांनी करुन ठेवले. याबाबत आपण अनभिज्ञ आहोत. बाह्यात: आपण त्यांचे गुण गातो, भजने म्हणतो, त्यांची प्रशंसा करतो. पण ते आपल्या आत प्रविष्ठ आहेत, एकदा का तुमची कुंडलिनी जागृत झाली की पुढील कार्य होण्यासाठी आत सर्व व्यवस्था त्यांनी आधीच तयार ठेवली आहे व पुढचे कार्य घडते.

सहस्राराची सुंदर व्यवस्था अशी आहे की आपल्या मेंदूचा आडवा छेद घेतला तर ते एका कमलपुष्पासारखे सर्व बाजूंनी पाकळ्यांनी विखुरलेले दिसते. सहस्त्राराची दुसरी कमाल बघा. जसे एक श्रीफळ किंवा नारळ. त्याची तुलना आपल्या मेंदूबरोबर केली जाते. आता ऋतंभरा प्रज्ञा बघा. आश्चर्य वाटेल ती अशी आहे की जर तुम्ही नारळाच्या झाडाखाली वा हजारो झाडांखाली असाल तरी तुम्ही कधी ऐकले कां की एखादे झाड कुणा प्राण्यावर वा मनुष्यावर पडले? दुसरी कमालीची गोष्ट पहा. समुद्रकिनारी अनेक नारळांची झाडे पहाता पण ती सर्व समुद्राच्या दिशेने झुकलेली असतात जरी मान्सूनचे जोरदार वारे किनाऱ्याच्या दिशेने झेपावतात. कारण सागर हा आपला गुरु आहे. म्हणून ते त्याच्या दिशेला नतमस्तक आहेत. ही त्यांची समज नैसर्गिक आहे. आपली समज जरी उंच असली तरी नैसर्गिक नाही. आपण जरुरीपेक्षा जरा जादा आहोत, त्यामुळे ज्या गोष्टी आत्मसात करावयाच्या त्यांना आपण मुकतो. म्हणून जोपर्यंत आपण मध्यमार्गावर येत नाही तोपर्यंत कुंडलिनी जाग्रण अप्राप्य ठरते. तरीपण आज परमेश्वराची एवढी कृपा आहे., त्याची अनुकंपा एवढी प्रवाहित आहे. मला स्वत:लाच याचे फार आश्चर्य वाटते. हजारो लोक एकसाथ पार होतात. याबद्दल भृगुमुनींनी आपल्या नाडीग्रंथात लिहून ठेवले आहे. यामुळे रोग बरे होतील, त्यांचे त्रास कमी होईल व कुंडलिनी सहजगत्या जागृत होईल. हे भृगुमुनींनी हजारो वर्षापूर्वी लिहून ठेवले आहे याचा अर्थ ते सर्व जाणत होते. आपल्या देशात जे अनेक विख्यात ग्रंथकार झालेत, प्रवचनकार झाले, मोठमोठे संत झाले व अनेक अवतरणे झालीत त्यांची आपल्याला

कितपत माहिती आहे. आजच मला एकाने विचारले की, शिवरात्रीचे काय महत्व आहे? या दिवशी शिवांचा जन्म झाला होता का? शिवांचा जन्म कधी होत नाही कारण ते सदाशिव आहेत. त्यांचा जन्म होणे याला काहीही अर्थ नाही. पण शिवरात्री म्हणजे त्या मोठ्या रात्री परब्रह्म महानिद्रा स्थितीत होते. जसे आपण रात्री झोपी जातो तशी ही सृष्टी निद्रावस्थेत होती. त्या महारात्री शिव, हे सदाशिव जे कधी बदलत नाही अवतार घेत नाही, जे एक साक्षीस्वरुपात सर्व संसाराकडे पहातात, त्यांनी आपली एक शक्ती आदिशक्ती जीला 'ई' ' म्हणतात. अथेना म्हणतात तिला आपल्यातून अलग केल. तिला सांगितले तू आता सर्व सृष्टीची रचना कर. म्हणून आजच्या या रात्रीला शिवरात्री म्हणातात. ज्या रात्री सदाशिव जागृत झाले. हे च सदाशिव जेव्हां आपल्या हृदयात आत्मस्वरूप प्रकाशित होतात तेव्हां ते 'शिव' असतात. . ज्या दिवशी ते जागृत झाले पुष्कळ लोक अज्ञानातून या दिवशी उपवास करतात.त्यांन ा शिवरात्रीचे महत्वच माहित नाही. काहींनी विचारले की, या दिवशी काय शिवांचा मृत्यू झाला? अहो ते अनंत आहेत त्यांना मृत्यू कसा येईल?

आज तो आत्मा आमच्या आत जागृत होण्याची वेळ आली आहे. आम्हीही अशा महारात्रीच्या अंधारात बुडालो होतो. जिला या घोर कलियुगाने व्यापले आहे. आज त्या जागृतीसाठी तुम्ही माझ्यासमोर हजर आहात. आज तो आत्मा तुमच्या आत जागृत होणार आहे. आत्मा हा सच्चितानंदस्वरुप आहे. सत्‌चित्त. सत् म्हणजे त्या सत्याला तुम्ही जाणता. याआधी सत्याला तुम्ही जाणत नव्हता. जे काही जाणले तो भ्रम आहे. समजा एखादी व्यक्ती तुमच्यासमोर आली तर तिला तुम्ही ओळखू शकणार नाही. तो भले सांगेल की मी हे चांगले केले, अमके केले तमके केले की तुम्ही लगेच भाळून जाल. पण तो तुरुंगातून सुटून आलेला भामटा आहे? तुम्हांला लुटायला आला आहे? हे तुम्हाला कळणार नाही. कारण तुम्ही सत्य जाणत नाही. सत्याला जाणणे म्हणजे त्या गोष्टीला जाणता, जे सर्व गोष्टींचे 'सार ' किंवा तत्त्व आहे. जसे मनुष्याचे सार किंवा तत्व काय आहे? ते म्हणजे त्याचा आत्मा. मग आधी जे ज्ञान होते ते नंतर अज्ञान होते व खरे ज्ञान आपल्याला आपल्या नसा नसावर व मध्यवर्ति मज्ज्यासंस्थेवर जाणवते. एक गृहस्थ माझ्याकडे आले व म्हणाले की मला अंजायनाचा त्रास आहे, आपण मला ठीक करा. मी बाहेर निघाले होते. पण मी त्यांना बसायला सांगितले. त्यांची कुण्डलिनी जागृत केली. थोडेसे त्यांना आत दुखले व तुम्ही आता ठीक आहात सांगून मी निघाले. तर ते उदास होऊन मागे येत म्हणाले मल हार्टअ‍ॅटॅकसारखे वाटते. मी परत मोटारीतून उतरुन त्यांना समजावले की, तुम्ही पूर्णपणे तंदुरुस्त आहात. तुम्ही तुमच्या डॉक्टराकडून खात्री करुन बघा. जेव्हा डॉक्टरकडे ते गेले आणि त्यांनी सांगितले की तुम्ही एकदम तंदुरुस्त आहात, कमालच आहे. तर तुमचे जाणणे हे त्या डॉक्टरनी सांगितले म्हणून होते. पण आमचे जाणणे हे तुमच्या चैतन्यातून (व्हायब्रेशन द्वारा) जे आमच्या आत्म्याने दर्शविले. जेव्हां आत्मा बोलतो ते हे चैतन्य सांगते, ओंकार बोलतो तेव्हा समजते. एखाद्या व्यक्तीला काय त्रास आहे हे पहायचे असेल तेव्हा तुम्ही दोन्ही तुमचे हात त्याच्यासमोर धरा. आपल्या बोटांच्या अग्रावर समजेल की या माणसास काय त्रास आहे. कारणाकडे न पहाता त्यापलिकडे जाऊन त्याची कुंण्डलिनी उचला. कुंडलिनी ही कारणमीमांसा व परिणामांच्या पलिकडे असते.(Beyond cause effect). कुंडलिनीच्या जाग्रणाने ती व्यक्ती ठीक होते. कधी कधी कुंडलिनीचे जाग्रण व स्थापन कठीण वाटते? पण एकदा ते झाले की सर्व काम फत्ते, सर्व ठीक होते. एखादी समस्या तुम्हांला त्रासदायक वाटते आणि मग तिची कारणमीमांसा करत बसाल. त्यात एक त्रास संपला तर दुसरा चालू होतो.पण त्यापलिकडे असलेले परमेश्वराचे साम्राज्य जे सहस्रात आहे त्यात तुम्ही उतरा. तेथे तुमच्या आगमनाचे स्वागतच होईल नमस्कार करुन आत या व स्थिर व्हा. मग पहा की कोण तुमच्याकडे डोळे वटारुन पाहू शकेल? कोणाची हिंमत होईल? रामदासांनी जसे म्हटले 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा भूमंडळी कोण आहे?'

म्हणून प्रथम पहा की आपण परमेश्वराच्या साम्राज्यात आहोत की नाही. त्यात जम बसला की नाही? मग त्यानंतर तुमची समज वाढेल. ती समज म्हणजे सत्य जे आपल्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर समजते. आता येथे जी

फुले विखुरलेली दिसतात ती आपले डोळे दाखवितात. जे आपल्या मज्जासंस्थेद्वारे समजते. त्यामुळे ती जाणिव आपल्याला होते. 'हे' ज्ञान आहे हेच वेद आहे. ज्यामुळे विद होते, बोध होतो हे सर्व मज्जासंस्थेद्वारे समजते व बाकीचे जे आहे ते सर्व बौध्दिक जमाखर्च, कुंडलिनी जेव्हां सहस्त्राराचे भेदन करुन वर येते त्यावेळेस आपण त्या ज्ञानाचे अधिकारी होतो. आपल्याकडे जे संत झालेत त्यावेळेस कुठे विद्यापीठ, कॉलेज वगैरे होते. पण स्वतःच ते ज्ञानाचे भांडार होते. ते अत्यंत ज्ञानी, द्दष्टे होते. एकाहून एक सरस होते. लंडनमधील एक द्रष्टे विल्यम ब्लेक यांनी लिहीलेले भविष्य वाचले तर आश्चर्यच वाटते. असे द्दष्टे जसे मार्कंडेयासारखे अनेक झालेत तसे तुमच्यातून का नाही होणार? सुरवातीला पाण्यातून एकच मासा बाहेर पडला. नंतर १०-१२ बाहेर पडले. हजारो झालेत असे अनेक मसे बाहेर पडून आज मानवस्थितीला प्राप्त झाले आहेत. आशा तऱ्हेने हजारो वर्षे तपस्या करुन परमेश्वराकडे योग मागितला, मेहनत केली व आता आम्ही मानवस्वरुपात अवतरलो. परमेश्वराला प्राप्त करण्याची आपली इच्छा जो तुमचा हक्क आहे तो तुम्हाला मिळालाच पाहिजे. जे आपल्या संतांनी अवतरणांनी सांगून ठेवले ते स्वरुपात उतरलेच पाहिजे. कुंडलिनीच्या जाग्रणातून तो प्रकाश तुमच्या नसानसातून प्रवाहित होणार आहे. म्हणजे तुम्ही योगीजन होणार. योगी झाल्याशिवाय कुठलीच गोष्ट पारखून घेता येत नाही. सत्य जे आमच्या मुखातून बोलले जाते ते सत्य आहे की नाही ते जाणण्यासाठी तुम्ही योगी असायला पाहिजे. आम्ही सांगतो ते सत्य आहे की कसे? तेव्हां आपले हात पसरा व पहा तेव्हां तुमच्या हातातून चैतनलहरी वाहू लागतील व तुम्हाला ते सत्य समजेल. तुम्ही प्रश्न विचारा की या संसारात परमात्मा आहे की नाही? परमात्मा आहे म्हणून लगेच तुमच्या हातातून चैतन्य लहरी वाहू लागतील. समोरचा माणूस दुष्ट असला तर तो कसा आहे? हे पहाल तर तुम्हांला हातावर गरम लागेल किंवा एखादा फोडसुध्दा येईल व चैतन्य लहरी बंद होतील. परंतु संत व राक्षस यांना ओळखण्याचे इतरही मार्ग आहेत.ते तुमी बुध्दीने जाणू शकता. ज्या माणसाची द्दष्टी तुमच्या पैशावर सत्तेवर वा तुमची मुले बायका याकडे आहे असा मनुष्य कधीही संत असू शकत नाही. कितीही सांगितले तरी लोक त्या चुका करतात.

तर सत्य जाणण्यासाठी कुंडलिनीच्या उत्थापनाने ती सहस्त्रारात येऊन ते प्रकाशित झाले पाहिजे व त्यातील एक हजार पाकळ्या त्या सुंदर कमलासारखे डोलू लागतील. तुम्ही हे आता पाहू शकत नाही नंतर दिसेल कारण तुम्हीच ते होता, स्वयं प्रकाश होता तर ते तुम्ही कसे पहाल? जेव्हां तुमचा दीप प्रज्वलीत होतो तेव्हा त्याने प्रकाश दिलाच पाहिजे. जोपर्यंत हा प्रकाश तुमच्या बुध्दीत येत नाही तोपर्यंत तुमची शक्ती हजार पटीने कमी असते. मी म्हणते तिला अंतच नाही, ती अनंत आहे. एखाद्या विशाल वृक्षाचे बीज अगदे छोटे असते व ते अंकुरल्यानंतर त्याच उत्तुंग वृक्ष होतो. तव्दत तुमची सिमित, तोकडी वाटणारी ही बुध्दी अशारीतीने अनेकपटीने वृध्दींगत होते. तिच्या अनेक शाखा बहरुन तिला अधिक विस्तारीत स्वरुप येते. हे परमात्म्याचे, आत्म्याचे सत्य स्वरुप आहे. आत्मा सत्यच दाखवतो. त्यासाठी सहजयोगात बैठक असायला हवी. तुम्ही जे संगीत ऐकले ते समजण्यासाठी बैठक (मेहनत)लागते. तुम्ही पार तर झालात पण त्यानंतर बैठक हवी अभ्यास हवा. या अभ्यासाशिवाय ती नाजूक, सुक्ष्म संवेदना जागृत होऊ शकत नाही. त्याशिवाय तुम्ही समर्थ होत नाही.पूर्ण प्रभुत्व येण्यासाठी बैठक लागते, अभ्यास हवा. कारण ते नसानसावर जाणवते. त्या नसा या उच्च नव्या जागृतीच्या आयामात जागृत होत नाही तोपर्यंत तुम्हांला ते जाणवणार नाही.

तसेच आपण आपल्या आत कोणता दोष आहे हे समजू शकाल. जेव्हा तुम्हीच सत्यस्वरूप होता, तेव्हां तुम्ही असत्याचा स्वीकार करणार नाही. एखाद्या कापडावर डाग पडला आणि तो उजेडात दिसला तर आपण प्रथम विचार करतो की तो कसा घालवायचा. त्याचप्रमाणे आपण आपल्यापासून अलग होऊन, जे असत्य आहे त्याचा स्वीकार करणार नाही. जसे एक गृहस्थ माझ्याकडे आले व म्हणाले श्रीमाताजी माझी आज्ञा ठीक करा म्हणजे त्यांचा वाढलेला अहंकार तो काढावा. एखाद्याला आपण तुमचा अहंकार वाढला असे सांगितले तर तो दुखावेल. जेव्हां अज्ञा चक्र दुखते तेव्हा तुम्ही म्हणता श्रीमाताजी माझे अज्ञाचक्र

खराब आहे ते ठीक करा. आत जर एखादा दोष निर्माण झाला तर तो दुखेल, ते तुम्हांला जाणवेल व तेथून सूचनाही मिळेल. ते तुम्ही तुमच्या बोटावर जाणू शकाल. आता एखादा त्रास असेल तर त्या त्रासामुळे तुम्ही एकाग्र, एकाकार राहू शकत नाही. (तुम्ही फार गंभीर दिसता, विषय जरी गंभीर असला तरी तुमचे चित्त प्रसन्न ठेवा)

एक साहेब मिनीस्टरला भेटायला गेले. तेथे एकजण इकडून तिकडून जणू धावतच होता. ते त्याला म्हणाले अरे तुम्हांला काय झाले? तर ते ओरडून म्हणाले, 'तुम्हाला ठाऊक नाही मी पी.ए. आहे' हे जे आम्ही आपल्या डोक्यावर चढवतो व तो पैशाचा, पदाचा व बुध्दीचा हा अभिमान नसून दुराभिमान आहे. अशा गर्वाने माणूस उगीचच आपल्याला (नसलेल्या)घोड्यावर चढवतो. पण योग प्रस्थापित झाल्यावर हे सर्व गळून पडते. हे सर्व बाह्यात आहे. जर प्रकाशात तुम्ही साप धरला तर लगेच तो तुम्ही सोडून देता, तसेच हे सर्व सुटून जाते. जेव्हां कुंडलिनी आज्ञा चक्रावर येते तेव्हा तेथील देवता जागृत होऊन वरील अहंकार व प्रतिअहंकाराच्या फुग्यांना शोषून घेते व जी जागा निर्माण करते तेथून कुंडलिनी सटदिशी टाळूतून बाहेर येते. तेव्हां तुमचे हात बोलतात व ती सांगते तुम्ही पार झालात. जे पार होतात त्यांनाच हातावर थंड हवा (चैतन्य)जाणवते. ज्याना होत नाही त्यांना कठीण जाते, समजत नाही. पण पार झाल्यावर मग तुमच्या विशुध्दी चक्रावर दोष आला किंवा नाभी चक्रावर असेल तर ते तुम्ही तुमच्या बोटाच्या अग्रावर समजू शकाल. व त्याबाबत समजू शकेल, निवडणुकविषयी समजू शकेल. इथे बसल्याबसल्या सर्व जगातील गोष्टी तुम्ही समजू शकाल. पण माणूस जेव्हां सहजयोगात उतरतो, तेव्हा त्याचे चित्त या गोष्टीवरुन हटून परमात्म्याकडे लागून रहाते. त्याला असल्या गोष्टीत रस वाटत नाही. जर तुम्हांला मधुर असे अमृत प्यायला मिळाले तर तुम्ही त्या गढूळ पाण्याला स्पर्श ही करणार नाही. क्षुल्लक गोष्टीवरील लक्ष उडून, तुमच्या प्रायॉरिटीज वाढवून तुम्ही उच्च पातळीचे व्यक्तित्व प्राप्त करता. ज्यापासून आनंद घेता., त्याचाच स्विकार करता, एखादा दारुडा त्याची संध्याकाळची वेळ झाली की सर्व काही सोडून बरोबर दारुच्या अड्यावर येतो. हीच स्थिती योग्यांची होते जेव्हां



ते त्यात एकताना होतात . त्यातून ते (आतील)शांतीचा अनुभव घेतात जी आत्म्याची देणगी आहे. नामदेवांच्या एका अभंगात वर्णन आहे की एक मुलगा अकाशात पतंग उडवित असतो. पतंगाची आकाशांत उत्तुंग भरारी चालू आहे, उडविणारा मुलगा इतर मुलांबरोबर हसतो, गप्पा करतो पण त्याचे चित्त त्या भरारी मारणाऱ्या त्या पतंगावरच असते. योग्यांचीही हीच कथा असते. ते इतरांबरोबर बोलत असले तरी त्यांचे चित त्या आत्म्यावर असते. नामदेवांच्य दुसऱ्या एका काव्यात, गावातील स्त्रिया पाण्याने भरलेल्या चार चार घागरी डोक्यावर घेऊन, गप्पा मारत, मजा करत आपल्या सख्यांच्याबरोबर झपाझप चालत असतात. पण त्या सर्वांचे चित्त त्या डोक्यावरील घागरीवर. तसेच तिसऱ्या एका पद्यात त्यांनी सांगितले की, एक माता आपल्या मुलाला पाठीवर बांधून घरातील व इतर काम भराभर उरकत जाते.पण तीचे सर्व चित्त आपल्या मुलावरच असते.

अशीच ही कुंडलिनी तिचे चित्त सर्वथ: तुम्हांवर असते आणि उत्कंठेने आपला मुलगा य स्थितीला केव्हां येईल जेव्हां तुम्हाला तो पुनर्जन्म देऊ शकेल. दुनियेच्या दुसऱ्या कुठल्याही गोष्टीत तिला रस नसतो. ही तुमच्यातील शुध्द इच्छा असते, तिचे जोपर्यंत हे कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत तिला चैन पडत नाही.

आत्म्याचे स्वरुप असे आहे की तो सत्य जाणतो. या जगात तीन तऱ्हेचे लोक सापडतात. एक तामसिक जे असत्यालाच सत्य समजून आपले नुकसार करुन घेतात. राजसिक जे सत्य व असत्य यातला फरकच समजत नाही आणि तिसरे ते सात्विक जे फक्त सत्याचाच स्विकार करतात. जसा रत्नपारखी फक्त हिरा बरोबर ओळखतो, तुम्ही सत्याला बरोबर पकडता. एकदा एक कुलटा समजल्या गेलेल्या स्त्रिला काही लोक दगड मारत होते तेव्हां ते पाहून इसा मसीहा मधे पडले, जरी त्या स्त्रिशी काही संबंध नसला तरी देखील आणि त्यांनी विचारले की ज्या कोणी काही पाप केले नाही त्या माणसाने आधी दगड मारावेत. हे ऐकून सर्वांचेच हात थांबले. कारण मसिहा साहेबांना हे ठाऊक होते की, या स्त्रिने जेवढ्याकाही वाईट गोष्टी केल्यात , आयुष्यात चुका केल्यात त्याला ईश्वर शिक्षा देइल किंवा क्षमा करणारा तो आहे. या लोकांना तिला दोष देण्याचा काय अधिकार आहे. ज्यांनी सत्याला जाणले ते असत्याबरोबर कसे उभे रहातील? प्रकाशात सर्व दिसत असताना तुम्ही ते उधळणार? जर तुम्हांला दिसले की यामुळे माझे नुकसान होणार आहे, मला त्रास होणार आहे तुम्ही म्हणाल का '' आ बैल मुझे मार'' हा प्रकाश आपल्या आत नसेल तर तुम्ही आपल्या जीवनाची बरबादी करता. पैशाने परिस्थिती सुधारते असे नाही. एखाद्याला पैसे मिळाले की तो चालला दारुच्या गुत्त्यावर. एखाद्याला उच्च पदावर बसवा, पंडिताला सत्ता द्या किंवा त्यांना सत्ता मिळू द्या त्यांचे डोके उलटेच चालेल. माणसाला सत्ता पेलवत नाही, संपत्ति पेलवत नाही स्वातंत्रता झेपत नाही अशी माणसाची स्थिती. पण हेही खरे की योगाने याहीपेक्षा वरची स्थिती तुम्ही प्राप्त करु शकता. भोग तेव्हांच घ्याल जेव्हां तुम्ही सत्यावर उभे रहाता. आता येथे केलेली फुलांची सजावट पहाताना सामान्य माणूस ही फुले कोठून आणली, केवढ्याला आणली, कशी आणली इ. विचारात गुंतुन जाईल. पण त्या जागी योगी असेल तर त्या सजावटीचा, ज्यांनी अगदी ऱ्हदय ओतून, ज्या कोणी केले हे माहीत नसतानाही तो त्या निराकार निर्विकार स्थितीत राहतो, त्याच्या आतून तो आनंद ओसंडत असतो,त्यात विचार नसतो. तो निर्विचारतेत असतो. अशा प्रकारचा आनंद तुम्हाला निर्विचार स्थितीतून मिळतो. तो तुम्ही सत्यातून मिळवता, विचारातून मिळवत नाही. विचाराने ती आनंददायी शक्ती लुप्त होते. त्याच्यात आल्हाद नसतो.सत्याशिवाय हे घडत नाही. राधेला परमेश्वराची आल्हाददायी शक्ती मानतात. ही आल्हाददायनी शक्ती तुम्ही विचार करत बसाल तर ती लुप्त होते. पण निर्विचारतेत एखादी गोष्ट पहाल तर त्यात असलेला आनंद, त्यात असलेले सत्य, जे निराकार स्वरुपात असते ते तुमच्यातून असे वाहू लगेल की ती सर्व प्रेमशक्ती तुमच्यातून वाहू लागेल व ते तुम्हालाही जाणवेल. त्यात तुम्ही अगदी निश्चिंत होता. जसे आजचे संगीत होते. जर तुम्ही म्हणाल आता वेळ झाला, गेले पाहिजे. इ.विचार कराल जर तुम्ही मी त्या आनंदाला मुकाल. निर्विचारतेत त्या संगीताचा खरा परिणाम तुम्ही अनुभवू शकता.

जेव्हां तुम्ही योगीजन होता, तेव्हा तुम्ही सहस्रारात स्थिर होता, तुम्ही वर्तमानात उतरता, ना भूतकाळांत ना भविष्यात. तुम्ही वर्तमानात रहाता. प्रत्येक वर्तमानाचा क्षण स्वत:चा आयाम एक दिशा घेत जणू एक आरसा होतो. त्यातून ज्या छटा तुम्हाला दिसतात त्या पहाता तुम्ही एवढे मजेत असता की विचारायला नको. एवढ्या हजार जिव्हा असूनही जेव्हा मजा येत नाही पण त्या वर्तमानाची जेवढी मजा घेता त्याला पारावार नाही. जेव्हां आत्मा जागृत होतो तेव्हां त्याच्या स्वभावावरुन जो आनंद पाझरतो तो आपल्या आत स्फुरित होतो, ते सांगावे लागत नाही. तुमच्या चेहऱ्यातून तो ओसंडत असतो. जेव्हां पहिल्यावेळेस मी पॅरिसला गेले होते तेव्हां मला पाहून लोक म्हणत 'माताजी तुम्ही खूष दिसता पण ते पॅरिसमधे स्विकारले जाणार नाही' कारण जे लोक फार मजेत आहेत ते फार अज्ञानी आहेत असे वाटते. तर मला म्हणाले तुम्ही थोडे कठोरपणे बोला, पण माझ्यासाठी ते शक्य नाही. मी म्हणाले तुम्हीच मला जरा बिघडलेले वाटतात. ते तसे आहेत

कारण प्रत्येक तिसऱ्या घरात दारूच्या बाटल्यावर बाटल्या उघडतात, चौथ्या घरात स्त्रियांबरोबर अनाचार चालू असतो तर पाचव्या घरात कटकारस्थान शिजत असते, अशा स्थितीत तेथे काय आनंदाचे साम्राज्य दिसेल? मी तेथून पायी जात असताना लोक मला एकमेकांत कुजबुज करताना दिसले. तर मला समजले की आता अष्टग्रही होणार आहे आणि त्यात सर्व जगाचा नाश होणार आहे. त्याची ते वाट पहात आहे. मी म्हणाले त्यापेक्षा इथे जी नदी आहे त्यात जाऊन आधीच उड्या मारुन टाका. पण अष्ट ग्रहीतून आपण वाचणार नाही का हा विचार त्यांच्यात नाही. अशी सर्व स्थिती, असे ते दुःखी जीव, आमच्यासाठी हेच चांगले की लवकर मरणे. स्वित्झरलंड व नार्वेमधे एक प्रकारची जणू स्पर्धा लागते की आपल्या देशात जास्तित जास्त आत्महत्या कशा होतील. स्वित्झर्लंडमधे १७ ते २५ वयातील मुले याबाबत आपल्या देशाचा नंबर पहिला कसा लागेल याचाच विचार करतात. जास्तीत जास्त कशा आत्महत्या घडतील. हे खरे आहे की तुम्ही संपत्ती मिळविली पण आनंद मिळवलेला नाही.सर्व मिळवले, मोटारी फिरविल्या, ज्याची भारतीय लोक आकांक्षा धरतात., ते लोक आता कशा तऱ्हेने जीव द्यायचा याचा विचार करत असतात. पण ते जाणत नाही की मेल्यावर पुन्हा जन्मणारच. मग पुन्हा तेच रडणे. कोणी कायमचा मृत नसतो हीच अडचण. पण हे बदलले पाहिजे याचा विचार नाही. तीच जर तुमचीही धारणा असेल तर करा उपवास, द्या स्वतःला पीडा आणि नष्ट व्हा. पण याची काय जरुरी आहे.?

सत्य हे आपल्या आतच स्थित आहे. आपला आनंद आपल्या आतच आहे आणिएका क्षणात तो मिळवूही शकतो, सहजतेत तो मिळू शकतो, यासाठी थोडे उन्मुख व्हा. वर बघा, ते प्राप्त करण्यसाठी कुंडलिनी सहस्रारात न थांबता त्याचे भेदन होऊन वर येणे जरुर आहे. ते भेदनही सूक्ष्म तऱ्हेने होते, आता कुठली नाडी कुठे आहे ती कशी कार्यान्वित होते? कुठली चक्रे कुठे आहेत?ती कशी उघडतात? हे सर्व येथे सांगणे आवश्यक नाही. जशी एखादी मोटार आहे जर तिची कुठली नाडी कुठे आहे, आत कायकाय आहे ? हे न पहाता एकदम गाडी सुरु करुन तिची मजा घेता तसेच सहजयोग प्राप्त केल्यावर हळू हळू त्याची



मजा कशी घ्यायची ते पहा, शिकून घ्या. एकदम समजले नाही तरी मजेत रहा या मौजेचा आनंद सर्वांना वाटत चला. आपले चित्त प्रकाशित होते. या चित्ताच्या प्रकाशामुळे तुमच्यात एक नवी जागृति येते त्याला 'सामुहिक चेतना' (collective consceious) असे म्हणतात. मी तर त्याला 'सामुहिक शुभचेतना' असे म्हणेल. शुभ -अशुभ विचार असे आमच्यासाठी काही नसते. शुभ हेच की हे चेतना आमच्यातून वाहते. ज्या गाण्याने, ज्या संगीताने, ज्या भक्तीने हे चैतन्य वाहते ते सर्व शुभ आहे. ह्याच चैतन्य लहरी, सौंदर्य लहरी, ही शुभ चेतना आमच्या आत जागृत होते. म्हणजे ती बुध्दीत येते असे नसून आम्ही जाणू शकतो की आमच्या आत कोणता दोष आहे? आत्मसाक्षात्कार होतो आणि आम्ही व्यष्टीला प्राप्त करतो. तसेच समष्टीमधेही जाणतो. म्हणजेच आम्ही स्वतःबद्दलही जाणतो तसेच सामुहिकतेलाही समजते . आता सामुहिकतेचा चमत्कार

बघा. त्याबाबत तुम्ही अनेक अनेक सिध्दांन्त उभे केलेले आहेत. एक म्हणतो आम्ही भांडवलशाही मानतो, कोण म्हणतो आम्ही कम्युनिस्ट आहोत. इ. पण हे सर्व भंपक आहे व्यर्थ आहे. खरे म्हणजे जो योगी असतो म्हणजे आमच्यासारखे. आम्ही खरे भांडवलदार आहोत कारण आमच्याकडे अनेक शक्त्यांचा संचय आहे. आम्ही कम्युनिस्ट ही आहोत कारण आम्ही ते सर्वांना वाटून टाकतो. त्याशिवाय आम्हाला चैन नाही. एक साहेब आम्हांला म्हणाले, ' तुम्ही हे कशाला करता?' जागृती देत बसता? तुमचे पति चांगले आहेत, तुमची मुलेबाळे आहेत, सुखी आहात. मग घरी शांत बसावे? पण कुठे बसलो आम्ही? जोपर्यंत हे वाटत नाही तोपर्यंत चैन कुठे? मजा वाटत नाही. जसा मद्यपि कधीएकटा मद्य घेत नाही. त्याला एकट्याला मजा येत नाही. आम्हालाही वाटल्याशिवाय राहवत नाही. तुम्ही सामूहिकतेत जागृत होत तुमचे चित्त हे विराटात (जे अकबर आहे) जागृत होते जे आदिपुरुषाचे असते. जसे शरिराचे अंग प्रत्यंग जागृत होते, तशा रितीने त्या विराटाचे अंगप्रत्यंग बनून तुम्ही त्यात जागृत होता. यानंतर मग तेथे दुसरा कोणीच नसतो. तुम्ही कोणावर उपकार करता? तुम्ही कोणाला देताय? जसे आपले एक बोट दुखु लागले तर आपोआप दुसऱ्या बोटाने आपण रगडतो काही सांगण्याची जरुर नसते. शरिरात तक्रार निर्माणं झाली तर सर्व शरीर मदतीस धावते.

रुझ्वेलव्हटनी सांगून ठेवले आहे की Porerty anywhere is a threat to prosperity everywhere सामुहिकतेसाठी हे महत्वाचे वाटते. तुम्ही जर सामूहिकतेत जागृत असाल तर कुठेही एखादी समस्या निर्माण झाली तर तुम्हाला ते जाणवेल. तुम्ही जर नुसती प्रार्थना जरी केली तरी त्याचे निवारण होऊ शकते. त्यासाठी कोणाची मदत लागत नाही. तुम्ही स्वत: प्रमात्म्याला विनवा, तो तुमचे ते कार्य निभावतो. तो ते करतो. हजारोंच्या बाबतीत हे घडले आहे. इथे असे अनेक सहजयोगी आहेत ज्यांनी २/३ वर्षात असे अनुभवले आहे. तुमचा विश्वास अतूट असेल तर परमात्माही झुकतो. माझ्याकडे अनेक आजारी व्यक्ती येतात. त्यांना ठीक करता करता माझे कधी कधी डोके पिकून जाते. हात अगदी थकून जातात. आसामहून एक जण आले होते. त्यांना कॅन्सर होता. फक्त पहिल्यांदाच माझ्या कार्यक्रमाला हजर होते. ते परत गेले तेव्हा त्यांचा कॅन्सर बरा झालेला पाहून त्यांच्या डॉक्टरांनाही नवल वाटले. तसेच महंमद नावाचे गृहस्थ ते अल्लाला खूप मानत. त्यांना डायबेटीस होता. मुंबईत माझ्या कार्यक्रमाल एकदाच आले. ते ना मला भेटले ना माझ्याशी काही बोलले पण त्यांचा डायबेटीस पूर्ण बरा झाला. काही लोकांची कुंडलिनी उचलताना मी अगदी हात टेकते. काहीही करून त्यांना जागृती येत नाही. अश लोकांचे डोके अगदी गच्च असते. अहंकार अगदी टेकड्याएवढा असतो. मग कुंडलिनीही विचार करेल की यांना अजून थोड्या ठोकरा खाऊ द्या. म्हणून सहजयोगात नम्रतापूर्वक व व्रतनिश्चयाने उतरणे जरुर आहे. मी नेहमी म्हणते की 'येरागबाळ्याचे येथे काम नाही आलतूफालतू लोकांचे काम नाही. जे वीर आहेत त्यांनीच पुढे यावे बाकीच्या बेकार लोकांसाठी सहजयोग नाही. तसे स्वत:ला वीर समजणारे खूप आहेत. त्यांना तंबाखू सोडा म्हटले तर ती सुटत नाही हे कसले वीर? वीर असेल त्यांनीच समोर यावे. वीरांच्या गळ्यातच कुंडलिनीची माळ पडते. भारतात असे अनेक वीर होऊन गेलेत. काही मागे रहातात त्यांनाही थोडे पुढे ओढले पाहिजे. म्हणजे ते तयार होतील. त्यासाठी हिंमत ठेवा, दृष्टिनिश्चयी असले पाहिजे. सहजयोग मिळाल्यानंतर लोक इतके शुध्द होतात जणू दुर्गंधीपासून कायम दूर रहातात. जे रोज दारु पिऊन धुंद असत, सिगारेट पीत, त्यांचे हे सर्व सुटलेले पाहून बरोबरच्या लोकांना वाटते हा एवढा कसा बदलला? याला काय झाले? हे कसे घडले? असे अनेक आधी त्यांच्या गुरुला चिकटून होते पण नंतर अगदी तेजस्वी व्यक्ती होतात. या तेजस्वितेच्या मागे अत्यंत करुणामय, प्रेममय, अतीव सुखदायी अशी शानदार गोष्ट जी तुमचे चित्त अशा एका नया आयामात, सामुहिक चेतनेद्वारे, उच्च जाणिवेत उतरवते. हे पाहून तुम्ही स्वत: आश्चर्य चकित होता. ते विचारतात 'श्रीमाताजी आम्ही विषेश काही न करता हे कसे घडले ? योगक्षेमवहाम्यहम् . योग झाल्यानंतर परमात्मा तुमचे क्षेम पहातो' हे श्रीकृष्णांनी सांगितले आहे. ते घटित होते आणि सहस्त्राराचा चमत्कार म्हणजे त्याची जागृती, त्यामुळे नवेनवे आयाम नवनवे विचार आणि किती उत्फूर्त

प्रभा तुम्हाला मिळतात. तेव्हा तुम्हालाच प्रश्न पडतो की हे माझेच मस्तक आहे का? ही मुले अभ्यासात मागे असणारी आता एकदम फर्स्ट क्लास फर्स्ट कशी? असे लोक, ज्यांना कलेचा गंध नसतो, ते एकदम कलाप्रवीण होतात.अनेक लोक ज्यांना नोकऱ्या नव्हत्या, काय करावे हेच कळत नव्हते असे, लखपती होतात हे कसे घडले? अशा शक्त्या आपल्यातच आहेत. लक्ष्मीची शक्तीही आपल्यात आहे. जेव्हां मनुष्य जागृत होऊन सृजनशील बनतो, कलाकार बनतो आणि त्याच्यात सृष्टीचे निर्माते ब्रह्मदेव जेव्हा जागृत होतात, जे स्वाधिष्ठानावर अधिष्ठित आहेत त्यांच्याकडून फार महान अशी निर्मिती होते. तसे असे महान कलाकार निर्माण होतात. मी सांगितले की या जगतातील सर्व महान कलाकार हे सर्व पार झालेले होते. जर ते साक्षात्कारी नसते तर ते एवढे महान नसते. हल्ली लुटुपुटीचे कलाकार दिसतात, तुटपुंजे लेखक आहेत. एखाद्या मंत्र्याची चाकरी सोडली की लागले त्याच्याविरुध्द लिहायला. माझे भाषण ऐकले की बसले काहीतरी लिहीत. असे तुटपुंजी लोक जेव्हां आत्मसाक्षात्कारी होतात. तेव्हां त्यांना कळते की मी हे काय करत होतो. माझ्याकडे रत्नांचा ठेवा असतांना मी कवडी कां जवळ केली.

अशी जेव्हां तुमच्यात जागृती येते, आतून आंदोलन निर्माण होऊन त्यातून मधुर संगीताची निर्मिती होते. मग तुम्ही कांही एकटे नसता. नेहमी आपण ऐकतो 'मी फार बोअर झालो' असे शब्दही निघणार नाहीत. जो आपल्या आत रंगला तो बोअर कसा होईन? भले तुम्ही जंगलात असा, नाहीतर लोकांत असा तुमचे व्यक्तित्व असे होईल की तुमच्यातून या (प्रेमाच्या )धारा, तरंग वाहू लागतील. त्यामुळे तुम्ही जेथे असाल तेथील सर्व लोकांना त्याचा फायदाच होईल. एक सहजयोगी राहुरीहून बसने येत असता, ती बस खाली खोल दरीत पडली. तीन चार पलट्या घेऊन परत चार चाकवर व्यवस्थित उभी झाली. जो ड्रायव्हर होता तो घाबरुन पळाला, पण आतील सर्वजण सुखरुप, कोणालाही कसलीही इजा झाली नव्हती. सर्वांना नवल वाटले की हे कसे घडले? कोणतरी देवमाणूस आपल्यात असणार? कोणीतरी त्या सहजयोगीनीच्या हातातील माझी अंगठी पाहिली आणि म्हणाले ह्याच त्य श्रीमाताजींच्या शिष्या ज्यांच्यामुळे आपण वाचलो. एकाने येऊन गाडीचालू करावयाचा प्रयत्न केला ती लगेच धावू लागली. अशी अनेक असंख्य उदाहरणे, अनुभव मी तुम्हाला देऊ शकेल. हे असे घडते कारण आपल्याला सांभळणारे देवदूतपण तुमच्याबरोबर असतात. सर्व सृष्टीचे ते कर्ते आहेत . लोकांना वाटते या दुनियेत आमच्याशिवाय इतर कोणीच नसते. अजून तुम्ही स्टेजवर उभे नाही, तुम्हांला कळेल की किती गण तुमच्या मागे पुढे चालतात, तुमचे रक्षण करतात. तुम्ही परमात्म्यालाअजून पूर्ण जाणले नाही. उलट तुम्ही त्याच्या चुका काढत बसता, दूषण देता. त्याच्याही पुढे जाऊन म्हणता ईश्वरच नाही याशिवाय दुसरे काही तुम्ही केले नाही. तुम्ही त्यांच्यासाठी काही करा अगर करु नका. तो प्रेममय परमपिता तुमच्यासाठी जे करायचे ते करतो व करेल. त्याला वाटते की त्याच्या साम्राज्यात तुम्ही यावे आणि त्या सिंहासनावर विराजमान व्हावे. हे स्थान तुमच्या सहस्रारात आहे. ज्यात तुम्हाला प्रवेश करावयाचा आहे. ब्रह्मरंध्र भेदून झाल्यावर त्याच्या कृपेने आशिर्वादाचे जे अनुभव येतील ते तुम्हाला तुमच्या नसानसावर जाणवेल, आपल्या जीवनात जाणवेल व्यवहारात जाणवेल, मित्रांमधे जाणवेल, आपल्या देशात, आपल्या समाजात जाणू शकाल. साऱ्या विश्वात जाणू शकाल. हाच त्याचा आशिर्वाद आहे आणि ते प्रस्थापित करण्याचा हा तुमच्यासाठी आजचा दिवस आहे. त्याला पुन्हा जाणावे, त्याला विसरू नये. त्यात घाबरून जाण्यासारखे काही नाही. तशी वेळ यावी लागते आणि ती आज आली आहे. आता सृष्टी बहारते आहे. अनेकात त्या फुलांचे फळात रुपांतर होणार आहे.- परमात्मा आपल्या सर्वांना सुखी ठेवो. ● ● ●



# सहज समाचार

## वनदेवी आयुर्वैदिक हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लिमीटेड

सर्वांना कळविण्यात येते की, प.पू.श्रीमाताजी निर्मला देवी यांनी दिनांक १ जून २००४ पासून वनदेवी हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लि.या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर या पदावर श्री राजेंद्र पुगालिया यांची नेमणूक केली असून असिस्टंट डायरेक्टर म्हणून श्री पराग राजे यांची नेमणूक केली आहे.

वनदेवी कंपनी मार्फत तयार होणारी औषधे व हेल्थ प्रॉडक्ट एक विशिष्ठ उद्देशाने परम चैतन्याच्या मार्गदर्शनात व आशीर्वादात तयार केली जातात. मागिल अनेक वर्षापासून सदर चैतन्यमय औषधांचा वापर करणाऱ्यांना मोठ्याप्रमाणावर लाभ झाला आहे. संपुर्ण भारतातील सहजयोग्यांना व नागरिकांपर्यंत लाभ होण्याच्या दृष्टीने सर्वत्र वितरण त्वरित करण्यासाठी कंपनीने आकर्षक स्किम तयार केली आहे.

कंपनीचे अधिकृत विक्रेते होण्यासाठी आपल्याला आपली सर्व माहिती, त्यामध्ये आपले शिक्षण, व्यवसायाची माहिती, आर्थिक माहिती, ओळखणाऱ्या व्यक्तीचे प्रमाणपत्र असावे. तसेच जर आपले जनरल स्टोरर्स अथवा औषधाचे दुकान असेल तर प्राधान्य देण्यात येईल.

अधिकृत विक्रेत्यांनी कंपनीच्या प्रॉडक्टची रुपये ५०००/- पेक्षा जास्त रक्कमेची एकाचवेळी खरेदी करणे आवश्यक असून त्यावर त्यांना एकुण रक्कमेवर १५ % वटाव देण्यात येईल. तसेच रोखीने एकाचवेळी रुपये ५०००/- पेक्षा जास्त रक्कमेची खरेदी करणाऱ्यांसाठी २० % वटाव देण्यात येईल. सदर कंपनीच्या प्रॉडक्टला देशभर प्रचंड मागणी येणार असल्याची कंपनीला खात्री आहे. कंपनीच्या औषधांची व हेल्थ प्रॉडक्टची तपशिलवार माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे.

तरी आपली सर्व माहिती (बायो डेटा) त्वरित खालील पत्यावर पाठवावा. आपली नियुक्ती कंपनीचे अधिकृत वितरक/विक्रेता म्हणून करण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कंपनीने स्वत:कडे राखून ठेवला आहे. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

### मुख्य कार्यालय

मे. वनदेवी आयुर्वैदिक हेल्थ प्रॉडक्टस प्रा. लिमीटेड
प्लॉट क्रमांक ८, चंद्रगुप्त हाऊसिंग सोसायटी,
कोथरुड, पौड रोड, पुणे ४११ ०२९
दुरध्वनी क्रमांक :- ०२० २५२८ ६७२२

ई- मेल vanadeviayur@rediffmail.com
वेब साईट www.vandeviayur.com

## युवाशक्ति कार्यशाळा, कारगिल हॉल पुणे १३ जून २००४

पुणे शहर व परिस्सरातील युवाशक्तीसाठी पुण्यातील खडकी भागातील क्विन्स मेरी टेक्नीकल इन्सिट्यूट या संस्थेच्या कारगील हॉलमध्ये कार्यशाळा आयोजित केला होता. साधारण ५००-६०० युवाशक्तींच्या उपस्थितीत कार्यक्रम सकाळी ९.४५ च्या सुमारास तीन महामंत्रांनी सुरु झाला. त्यानंतर श्री बागडदे आणि सहकारी यांनी ३ भजने सादर केली व स्वरांचा वापर करुन बॅलन्स कसा करावा हे प्रात्यक्षिकासह करुन घेतले. चि. यश इनामदार, प्रविण जावळकर यांनी युवाशक्तीला मार्गदर्शन केले. श्री नरके यांनी सहजयोग्यांची जबाबदारी तसेच पॉझिटीव्ह थिंकींग बाबत माहिती दिली. चि. मंगेश वडके, श्री डहाळे, श्री योगेश दगडे यांनी सहजयोग प्रचार व प्रसार याबाबत आपले विचार मांडले. कु.स्वप्ना संहिग यांनी कुमकुम बाबत तर चि अभिमन्यु नाईकरे यांनी आत्मपरिक्षणाबाबत माहिती दिली.त्या नंतर डॉ हुले यांनी आरोग्य व सहजयोग या विषयावर अत्यंत महत्त्वाची माहिती सांगितली. चि. प्रजोत उंबरकर व श्री गायकवाड यांनी चित्ताबद्दल माहिती दिली.

दुपारच्या सत्रात ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया यांनी आपले विचार मांडताना आपले अनुभव सांगत सर्व युवाशक्तीला बहुमुल्य मार्गदर्शन केले.युवाशक्तीच्या कु राणी गरुड हिने - समर्पण, कु गिरीजा शेटे - पृथ्वी तत्त्व, चि. राहूल दगडे - अहंकार व प्रतिअहंकार, कु. वर्षा शितोळे- प्रोटोकॉल्स, चि संजिव सूर्यकुमार- सहजयोगाच्या प्रगतीसाठी एकवीस पायऱ्या, कु मुग्धा पवार - मिरॅकल्स, कु मेघना जाधव - क्षमातत्त्व ,कु. क्षितीजा शिंगवेकर-व्हायब्रेशन्स या विषयावर माहिती दिली. शेवटी सामूहिक मेडीटेशन झाल्यानंतर कार्यक्रम संपला.

सदर कार्यशाळेच आयोजन व नियोजन तसेच सूत्रसंचलन कर्नल माने यांनी केले होते. त्यामधे युवाशक्तीच्या मुला-मुलींना वेगवेगळ्या विषयावर बोलण्याची संधी देण्यात आली. तसेच सदर कार्यशाळा विनामूल्य आयोजित केली होती.

## सहजयोग कार्यशाळा- मंचर पुणे दिनांक २० जून २००४

पुण्यापासून जवळ असलेल्या निसर्गरम्य परिसर असलेल्या मंचर जवळच्या गोरक्षनाथ टेकडी हॉलमध्ये ही कार्यशाळा आयोजित केली होती.. साधारण १२०० सहजयोग्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यामध्ये सुरवातीला श्री राहूल कुलकर्णी व सहकारी यांनी भजने सादर केली. सौ माधुरी राशिनकर यांनी ध्यानाची आवश्यकता व महत्त्व याबाबत सर्वांना माहिती दिली. श्री गायकवाड यांनी चित्ताबाबत माहिती दिली. श्रीमती नरके, श्रीमती भालेराव यांनी समर्पण बाबत तर कु भावना शिंदे हिने सुबुध्दी या विषयावर माहिती दिली.

दुपारच्या सत्रात श्री निंबाळकर यांनी आत्मपरिक्षण या विषयावर माहिती दिली. श्री धनवे यांनी आळस चैतन्याच्या कसा विरोधात आहे आणि त्यासाठी काय करावे याबाबत माहिती दिल्यानंतर डॉ गजरे यांनी प्रोटोकॉल्स बाबत माहिती दिली. नाशिकच्या सौ शैला जोशी यांनी सहजयोगाचा प्रचार व प्रसार बाबत माहिती दिली.सौ नरके यांनी समर्पण म्हणजे काय, याचे उदाहरणासहित समर्पक स्पष्टीकरण दिले.

पुणे परिसरात ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया यांच्या प्रोहत्साहनाने व मार्गदर्शनाने नवीन सहजयोग्यांना माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी अशा कार्यशाळा विनामूल्य आयोजित केल्या जात असून त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. तसेच अशा प्रकारच्या विनामुल्य कार्यशाळा घेण्यास प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींनी आशीर्वाद दिलेले आहेत. तरी आपल्या परिसरात अशाप्रकारच्या विनामुल्य कार्यशाळा आयोजित करुन त्याची माहिती चैतन्य लहरी कार्यालयाकडे पाठवावी.

## सहजयोगी प्रसाद प्रभाकर बंदरकर याला सुवर्णपदक

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींच्या कृपेने, नवी मुंबई ,सीबीडी, बेलापूर येथिल सहजयोगी चि. प्रसाद प्रभाकर बंदरकर याने मुंबई येथे झालेल्या दि. ग्रेटर बॉम्बे सायन्स रिचर्स असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या 'डॉ होमी भाभा बाल वैज्ञानिक (सीनियर) सायन्स टॅलेन्ट सर्च कॉम्पिटिशन' या परिक्षेत त्याला सुवर्ण पदक, विशेष प्रमाणपत्र व शिष्यवृत्ती देऊन गौरविण्या आले. सदर वृत्त व फोटो स्थानिक वृत्तपत्र सामना मध्ये दिनांक २२.३. २००४ रोजी प्रसिध्द झाले

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, दिनांक १६ एप्रिल २००४ पासून सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटों, कॅलेंडर, चैतन्य लहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फ़ोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत होणार आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फ़ोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठवावा. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. BEHIND HOTEL GRACE,
GROUND FLOOR, PAUD ROAD, KOTHRUD,
PUNE 411 O29. TEL. 020 25286537 , 020 25285232

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

# श्री आदिशक्ति पूजा

कबेला : ६ जून २००४











